- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शुक्रवार, १८ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २७९ | किंमत : २ रूपये

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# निवडणूक आयोगाने तृणमूल कॉँग्रेसचे नाव आणि चिन्ह गोठवले

## दोन गट निर्माण झाल्याने पक्षाचे नाव आणि चिन्ह गोठविले

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
भारत निवडणूक आयोगानं तृणमूल कॉँग्रेसच्या पक्ष चिन्हा संदर्भात मोठा निर्णय घेतला आहे. तृणमूल कॉँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर दोन गट निर्माण झाल्यानं पक्षाचे नाव आणि चिन्ह गोठवण्याचा निर्णय भारत निवडणूक आयोगानं घेतला आहे. पश्चिम बंगालमध्ये विधानसभेच्या दोन जागांसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. या निवडणुकीत दोन्ही गटांना तृणमूल कॉँग्रेसचं नाव आणि पक्ष चिन्ह वापरता येणार नाही. निवडणूक आयोगानं दोन्ही गटांकडून नवी नावं आणि नवी चिन्हं मागवण्यात आली आहेत.

अखिल भारतीय तृणमूल कॉँग्रेस नावाचा वापर आता दोन्ही गटांना करता येणार नाही. निवडणूक आयोगानं पक्षाचं नाव आणि चिन्ह गोठवलं आहे. पोटनिवडणुकीत दोन्ही गट या नावाचा आणि चिन्हाचा वापर करु शकणार नाहीत. निवडणूक आयोगानं ममता बॅनर्जी यांचा गट आणि ऋतब्रत बॅनर्जी गटाला नवं नाव आणि चिन्ह देण्यास सांगितलं आहे. दोन्ही गटांनी तीन तीन पर्याय द्यावेत असं आयोगानं कळवलं आहे. दोन्ही गटांना उद्या ११ वाजेपर्यंत नावं आणि चिन्हं द्यावी लागतील. निवडणूक आयोगानं तृणमूल कॉँग्रेससंदर्भात १७ सप्टेंबरला ममता बॅनर्जी आणि ऋतब्रत बॅनर्जी यांच्या गटाची बाजू स्वतंत्रपणे ऐकून घेतली होती. ममता बॅनर्जी गटानं निवडणूक आयोगानं अंतरिम आदेश देऊ नये अशी भूमिका घेतली होती. तर, ऋतब्रत बॅनर्जी गटानं पश्चिम बंगालमध्ये ६ ऑक्टोबरला होणाऱ्या पोटनिवडणुकीपूर्वी पक्षाच्या चिन्ह आणि नावासंदर्भात निर्णय घेण्याची मागणी केली होती.

ऋतब्रत बॅनर्जी यांच्या गटाकडून चंद्रिमा भट्टाचार्य, अकरुल जमान, अरुप रॉय यांच्यासह वकिलांनी निवडणूक आयोगात त्यांची बाजू मांडली होती. सुनावणीनंतर ऋतब्रत बॅनर्जी यांनी आम्ही आमची बाजू मांडली, आम्हाला विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं दिली आहेत. नंदिग्राम आणि रेजीनगर पोटनिवडणुकीसाठी पक्ष चिन्ह महत्त्वाचं झालं आहे कारण दोन्ही गटांनी उमेदवारी अर्ज दाखल केलाय, असं ऋतब्रत बॅनर्जी गटाकडून सांगण्यात आलं.





ममता बॅनर्जी यांच्या गटाकडून डेरेक ओब्रायन, कल्याण बॅनर्जी, महुआ मोइत्रा, सागरिका घोष यांनी निवडणूक आयोगात बाजू मांडली. ममता बॅनर्जी यांच्या गटानं अंतरिम आदेशाचा विरोध केला होता. अंतरिम आदेश देण्याला कोणताही आधार नाही, असा दावा ममता बॅनर्जी यांच्या गटाकडून करण्यात आला होता. आम्हाला कोणताही अंतरिम आदेश नकोय, असं कल्याण बॅनर्जी यांनी म्हटलं.

पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीत तृणमूल कॉँग्रेसचा पराभव झाल्यानंतर पक्षाचे खासदार फुटले आणि त्यांनी एनपीसीआयमध्ये विलीन होत असल्याचं सांगितलं. यानंतर नवनिर्वाचित आमदार देखील फुटले आणि त्यांनी ऋतब्रत बॅनर्जींच्या नेतृत्वात गट स्थापन केला.

### थोडक्यात

## वीजेचा कहर, ५ ठार

छ. संभाजीनगर : मराठवाड्यात गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांची खरीपाची पीके वाळून गेली आहेत. एकीकडे दुष्काळसृदश्य परिस्थिती असल्याने शेतकऱ्यांनी आता सरकारच्या निधीकडे, घोषणेकडे आस लावली आहे. आधीच पाऊस ना पाणी, पीकेही वाळून गेली. त्यातच, गुरुवारी दुपारी छ. संभाजीनगर जिल्ह्यात वीज पडून घडलेल्या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये पाच जणांचा मृत्यू झाला आहे, तर चार जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यात, सिल्लोड येथील दहिगावात वीज पडून पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाल्याची मन हेलावणारी घटना घडली.

जालन्यासह मराठवाड्यातील काही भागात वादळी वाऱ्यासह पाऊसाची हजेरी पाहायला मिळाली. त्यातच, संभाजीनगर जिल्ह्याच्या सिल्लोड तालुक्यातील दहिगाव येथे वादळी पावसादरम्यान शेतातील झोपडीत आसरा घेतलेल्या पती-पत्नीवर काळाचा घाला आला. झोपडीवर वीज कोसळल्याने पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचा मुलगा गंभीर जखमी झाला आहे. या घटनेनंतर स्थानिकांनी तात्काळ प्रशासनाशी संपर्क साधत घटनेची माहिती दिली. मात्र, या दुर्घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. दरम्यान, कन्नड तालुक्यातील पिशोर येथेही वीज पडण्याची दुर्घटना घडली. या घटनेत तीन महिलांचा मृत्यू झाला असून, दोन महिला आणि एक पुरुष गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. जिल्ह्यातील या दोन घटनांमुळे हळहळ व्यक्त होत आहे.

# तब्बल १२७ धावांनी भारतीय संघाचा विजय, ३-० ने मालिकाही जिंकली

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
भारतीय संघाने अफगाणिस्तानविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात जबरदस्त कामगिरी केली आहे. अभिषेक शर्माच्या वादळी खेळीनं अफगाणिस्तानचा डाव उद्ध्वस्त केला आहे. तिसऱ्या टी-२० सामन्यात भारतानं अफगाणिस्तानवर १२७ धावांनी विजय मिळवला आहे. या विजयासह भारतानं अफगाणिस्तानविरुद्धची टी-२० मालिका ३-० ने जिंकली आहे. पहिल्या डावात भारतासाठी अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

**अफगाणिस्तानचा संघ १४.१ षटकांत ९४ धावांवर सर्वबाद**

आज दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या तिसऱ्या टी-२० सामन्यात भारताने अफगाणिस्तानचा १२७ धावांनी पराभव केला. या विजयासह भारताने ३-० ने मालिका जिंकली. भारताकडून अभिषेक शर्मा, संजू सॅमसन आणि नितीश कुमार रेड्डी यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. प्रथम फलंदाजी करताना भारताने २० षटकांत ७ गडी गमावून २२१ धावांचा डोंगर रचला होता. या लक्ष्याचा पाठलाग करताना अफगाणिस्तानचा संघ १४.१ षटकांत ९४ धावांवर सर्वबाद झाला.



अभिषेक शर्माने भारतासाठी सर्वोच्च खेळी केली, त्याने ९ चौकार आणि ११ षटकारांच्या मदतीने ३४ चेंडूंमध्ये १०८ धावा केल्या. त्याने अवघ्या ३० चेंडूंमध्ये आपले शतक पूर्ण केले आणि पूर्ण सदस्य संघासाठी सर्वात जलद शतक करणारा फलंदाज ठरला. संजूनेही ५० धावा केल्या. या दोघांनी पहिल्या विकेटसाठी १४२ धावांची (५९ चेंडू) सलामीची भागीदारी करून संघाला मजबूत केले. अभिषेक शर्माच्या रूपाने संघाची पहिली विकेट पडली, त्यानंतर धावगती मंदावली.

**नितीश कुमार रेड्डीने एकाच षटकात तीन बळी घेतले**

दुसऱ्या डावात, नितीश कुमार रेड्डीने एकाच षटकात तीन बळी घेत भारतासाठी सर्वाधिक बळी घेतले. रवी बिश्नोईनेही तीन बळी घेतले. अक्षर पटेलने दोन बळी घेतले. जसप्रीत बुमराह आणि यश ठाकूर यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

**पहिल्या विकेटसाठी १४२ धावांची ऐतिहासिक भागीदारी**

अफगाणिस्तानविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन या जोडीने गोलंदाजांना चोप देत पॉवरप्लेमध्येच आपल्या संघाचे शतक पूर्ण करून इतिहास रचला. त्यानंतर अभिषेकने आपले शतक पूर्ण केले, पण १० व्या षटकात तो १०८ धावांवर बाद झाला. या दोघांनी पहिल्या विकेटसाठी १४२ धावांची ऐतिहासिक भागीदारी केली आहे.

अफगाणिस्तानविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्याची वेळ भारतीय संघावर आली. यानंतर अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन या जोडीने बॅटने धुमाकूळ घातला. पहिल्या षटकात केवळ ५ धावा झाल्या असल्या तरी, त्यानंतर अभिषेकने एक धगधगती खेळी सुरू केली. त्याने पाचव्या षटकात आपले अर्धशतक पूर्ण केले आणि त्यानंतर पुढच्या १४ चेंडूंमध्ये त्याने आपले शतक पूर्ण केले आहे. वादळी आणि व्करमी खेळी केली आहे.

## यूपीआय पेमेंटवर ग्राहकांकडून अतिरिक्त पैसे उकळल्यास गाठ सरकारशी

**नवी दिल्ली :** डिजिटल व्यवहार करताना ग्राहकांवर अतिरिक्त शुल्काचा बोजा पडू नये, यासाठी केंद्र सरकारने कठोर पावले उचलली आहेत. ऑनलाइन पेमेंटदरम्यान आकारला जाणारा कोणताही अतिरिक्त चार्ज सर्वसामान्यांच्या खिशातून वसूल करू नये, अशी सक्त ताकीद सरकारने दिली आहे. या पार्श्वभूमीवर, सरकारने देशातील प्रमुख पेमेंट ॲग्रीगेटर्ससोबत एक उच्चस्तरीय बैठक घेतली. डिजिटल व्यवहारांच्या सध्याच्या प्रणालीचा आढावा घेत, नियमांच्या अंमलबजावणीत कोणतीही त्रुटी राहू नये आणि कोणत्याही स्तरावर नियमांचे उल्लंघन होऊ नये, यासाठी प्रणालीतील उणिवा तातडीने दूर करण्याचे निर्देश सरकारने या बैठकीत दिले आहेत.

बैठकीत स्पष्टपणे निर्देश देण्यात आले की व्यापाऱ्यांनी ग्राहकांकडून त्यांच्या वाट्याचे शुल्क आकारू नये. अनेकदा असे दिसून येते की व्यापारी शुल्क किंवा इतर प्रक्रिया शुल्क थेट ग्राहकांच्या बिलांमध्ये जोडले जातात. सरकारने स्पष्ट केले आहे की, या नियमांची अंमलबजावणी अशा प्रकारे केली जाईल की व्यापारी ग्राहकांवर हे शुल्क लादणार नाहीत. या बैठकीत सरकारने कडक भूमिका घेतली. व्यापाऱ्यांनी स्वतःच्या वाट्याचे प्रक्रिया शुल्क ग्राहकांकडून वसूल करू नयेत, असे निर्देश दिले आहेत. अनेकदा व्यापारी डिजिटल व्यवहारांचे सेवा शुल्क किंवा अतिरिक्त चार्ज थेट ग्राहकांच्या बिलात जोडून त्यांची आर्थिक लूट करत असल्याचे समोर आले आहे. या गैरप्रकाराची गंभीर दखल घेत, व्यापारी हे शुल्क कोणत्याही परिस्थितीत सर्वसामान्य ग्राहकांवर लादणार नाहीत, अशा अत्यंत काटेकोर पद्धतीने नियमांची अंमलबजावणी केली जाईल, असा इशारा सरकारने दिला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीवर बारकाईने लक्ष ठेवले जाईल. पालनामध्ये काही त्रुटी आढळल्यास, त्या तात्काळ दूर केल्या जातील. डिजिटल इंडिया उपक्रमावरील जनतेचा विश्वास कायम राहावा आणि कोणत्याही अवाजवी आर्थिक भाराशिवाय त्यांना सुरक्षित व पारदर्शक व्यवहारांचा लाभ मिळत राहावा, हे सुनिश्चित करणे सरकारचे प्राधान्य आहे.

# मराठवाड्यात तात्काळ दुष्काळ जाहीर करा, उद्धव ठाकरेंचा आक्रमक पवित्रा

**वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर**
भाजप पुढच्या वेळी पुन्हा सत्ता पाहू शकणार नाही, असा मोठा दावा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला आहे. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून आज, गुरुवारी ( दि. १७) आयोजित 'तुमसे ना हो पाएगा' कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी मराठवाड्यात तात्काळ दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत देण्याची आग्रही मागणी केली, तसेच सत्ताधाऱ्यांवर चौफेर टीकास्त्र डागले.



१७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस आणि प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती असल्याचा उल्लेख करत ठाकरे म्हणाले, मराठवाड्यातील मोठमोठे होर्डिंग्ज पाहून सर्वकाही आलबेल असल्याचे भासवले जात आहे; पण प्रत्यक्षात मराठवाडा तीव्र दुष्काळाच्या छायेत आहे. मुक्तिसंग्राम दिनाला उपस्थित न राहता स्वतःच स्वतःला पुरस्कार खरेदी करणारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गुजरात दौऱ्यावर गेले. येथील शेतकऱ्यांच्या व्यथा आणि वेदना त्यांना कधीच कळणार नाहीत.

मराठवाड्यातील सत्ताधारी आमदारांवर तोफ डागत ठाकरे म्हणाले, मराठवाड्याच्या व्यथा पंतप्रधानांसमोर मांडण्याची हिंमत येथील एकाही लोकप्रतिनिधीत नाही. हैदराबाद मुक्तीसाठी सरदार वल्लभभाई पटेलांनी फौजा उतरवल्या होत्या. पश्चिम बंगालमध्ये निवडणूक जिंकण्यासाठी फौजा पाठवणाऱ्या या सरकारमध्ये पाकव्याप्त काश्मीरमध्ये सैन्य घुसवण्याची हिंमत आहे का?

**५ ऑक्टोबरनंतर शिवसैनिक पीक पंचनामे तपासणार**

शेतकऱ्यांच्या मदतीबाबत बोलताना ठाकरे यांनी शिवसैनिकांना थेट मैदानात उतरण्याचे आदेश दिले. राज्य सरकार ५ ऑक्टोबरपासून पीक नुकसानीचे पंचनामे सुरू करणार आहे. आपल्या शिवसैनिकांनी प्रत्येक गावात प्रत्यक्ष हजर राहून पंचनामे योग्य पद्धतीने होतात की नाही हे तपासावे. एकाही शेतकऱ्याची फसवणूक होणार नाही आणि सर्वांना मदत मिळेल, याची खात्री करण्याचे आवाहन त्यांनी केले.

**जातीपातीचे विष कालवून सत्ता उपभोगत आहेत**

भाजपवर तीव्र हल्ला चढवत उद्धव ठाकरे म्हणाले, भाजप ही केवळ सत्तेची पिपासू आहे. त्यांनी देशात हिंदू-मुस्लिम वाद पेटवले आणि महाराष्ट्रात जाती-जातीत संघर्ष उभा केला. मराठा विरुद्ध ओबीसी, धनगर, कुणबी, आदिवासी अशा सर्व घटकांना एकमेकांसमोर उभे केले जात आहे. एकीकडे मनोज जरांगे स्वतःचे प्राण पणाला लावून लढत आहेत आणि दुसरीकडे सत्ताधारी मलिदा लाटत आहेत.

## विमा नसल्यास पेट्रोल-डिझेल मिळणार नाही

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
सर्वोच्च न्यायालयाच्या विमा नाही, तर इंधन नाही या प्रस्तावाची अंमलबजावणी करण्यासाठी इन्शुरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट अथॉरिटी ऑफ इंडिया (आयआरडीएआय) लवकरच एका नव्या प्रणालीची चाचणी घेणार आहे. या अंतर्गत, ऑटोमेटेड नंबर प्लेट रिकग्निशन प्रणालीद्वारे वाहनांच्या नोंदणी क्रमांकांची पडताळणी इन्शुरन्स इन्फॉर्मेशन ब्युरो आणि वाहन पोर्टलवरील रेकॉर्डशी केली जाईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

आयआरडीएआय देशातील काही निवडक शहरांमध्ये या प्रणालीची चाचणी घेणार असून अद्याप शहरांची नावे निश्चित झालेली नाहीत. या प्रस्तावित यंत्रणेमुळे भविष्यात पेट्रोल किंवा डिझेल पंपांवर वैध थर्ड-पार्टी मोटार विमा नसलेल्या वाहनांना



इंधन देणे बंद करणे शक्य होईल. जर ही चाचणी यशस्वी ठरली, तर विम्याविना धावणारी लाखो वाहने अधिकृत विमा बाजाराच्या कक्षेत येण्याची शक्यता आहे.

**सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर हालचाली**

सर्वोच्च न्यायालयाने ४ ऑगस्ट रोजी दिलेल्या निकालात आयआरडीएआयला रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या सल्लामसलतीने वैध वाहन विम्याची स्थिती आणि इंधन पुरवठा यांचा संबंध जोडणारी प्रायोगिक व्यवस्था विकसित करण्याचे निर्देश दिले होते. या यंत्रणेत एएनपीआर कॅमेऱ्यांच्या मदतीने विमा नसलेली किंवा नोंदणी नसलेली वाहने ओळखली जाऊ शकतात. त्यानंतर संबंधित वाहनमालकाला अनिवार्य विमा काढण्यास प्रवृत्त केले जाऊ शकते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिल्लीपासून या प्रकल्पाची सुरुवात करून त्यासाठीची रूपरेषा आणि कालमर्यादा सादर करण्यास सांगितले होते.

**डेटा जोडणीचे आव्हान**

वाहन क्रमांकावरून विम्याची स्थिती रिअल-टाइममध्ये तपासता यावी, अशी तंत्रज्ञान आणि डेटा प्रणाली तयार करणे हे आयआरडीएआयसमोरचे मुख्य आव्हान आहे. आयआयबीकडे विम्याची माहिती असते, तर वाहनकडे वाहनांची नोंदणी माहिती असते.

संपादकीय लेखणीतून...

# अर्थकारणात उलथापालथ

जागतिक अर्थव्यवस्थेत सध्या मोठ्या घडामोडी घडत असून, अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हने कठोर पतधोरणाचे दिलेले संकेत, जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या भडकलेल्या किमती आणि बाँडच्या उत्पन्नात झालेली वाढ यामुळे जागतिक स्तरावर तीव्र अस्थिरता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर सर्वच देश संभाव्य आर्थिक संकटापासून बचाव करण्यासाठी आपापल्या परीने उपाययोजना आखत आहेत. नेदरलँड्सच्या डच मध्यवर्ती बँकेने अमेरिकेत सुरक्षित ठेवलेला आपला ८६ टन सोन्याचा साठा अचानक ब्रिटनमध्ये हलवल्याने जागतिक अर्थकारणात मोठ्या उलथापालथीची चर्चा सुरू झाली आहे. जगातील अनेक देशांनी सुरक्षा आणि तांत्रिक सोयीसाठी आपले सोन्याचे राष्ट्रीय साठे अमेरिकेत सुरक्षित ठेवले आहेत. न्यूयॉर्कमधील फेडरल रिझर्व्ह बँकेच्या सुरक्षित भूमिगत तिजोरीत जगातील सर्वांत मोठा सोन्याचा साठा जतन करण्यात आला आहे. या अत्यंत सुरक्षित मानल्या जाणाऱ्या तिजोरीत जमा असलेल्या एकूण सोन्यापैकी तब्बल ९८ टक्के सोने हे विविध सरकारे आणि त्यांच्या मध्यवर्ती बँकांचे आहे. २ सप्टेंबर रोजी डच मध्यवर्ती बँकेने या संदर्भात अधिकृत आणि महत्त्वपूर्ण घोषणा केली. उत्तर अमेरिकेत ठेवलेला अब्जावधी डॉलर्स मूल्याचा सोन्याचा साठा बँकेने ब्रिटनमध्ये हस्तांतरित केला आहे. वाढता जागतिक भू-राजकीय तणाव आणि अनिश्चिततेच्या काळात घेतलेल्या या निर्णयाला डच बँकेने संकटकालीन पूर्वतयारी असे संबोधले आहे. हे संपूर्ण हस्तांतरण अत्यंत गुप्ततेने मार्च ते ऑगस्ट दरम्यानच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने पार पाडण्यात आले. न्यूयॉर्क आणि कॅनडातून सोन्याचे हस्तांतरण करण्यात आले आहे. डच मध्यवर्ती बँकेने एकूण ३१३ मेट्रिक टन सोने न्यूयॉर्क आणि कॅनडाची राजधानी ओटावा येथे सुरक्षित ठेवले होते. त्यापैकी ८६ मेट्रिक टन सोने बँकेने सुरक्षिततेच्या कारणास्तव लंडनला हलवले आहे.

या हस्तांतरणापूर्वी, न्यूयॉर्कमधील तिजोरीत नेदरलँड्सच्या एकूण सोन्यापैकी ३१.३ टक्के तर ओटावामध्ये १९.७ टक्के सोन्याचा साठा उपलब्ध होता. मात्र, या ८६ टन सोन्याच्या यशस्वी हस्तांतरणानंतर आता न्यूयॉर्क आणि ओटावा या दोन्ही शहरांमध्ये मिळून डच सोन्याचा साठा केवळ १८.५ टक्क्यांवर आला आहे. अमेरिकेत आणि कॅनडात ठेवलेला आपला सोन्याचा साठा लंडन तसेच नेदरलँड्समध्ये हलवण्याच्या ऐतिहासिक निर्णयावर डच मध्यवर्ती बँकेने अधिकृत स्पष्टीकरण दिले आहे. बँकेच्या या निर्णयामागे आर्थिक सुरक्षितता, लवचिकता आणि बाजारातील व्यापारक्षमता वाढवणे ही मुख्य कारणे असल्याचे सांगण्यात आले आहे. सोन्याचा साठा हलवण्यामागचे मुख्य कारण डच मध्यवर्ती बँकेच्या आकडेवारीनुसार, २०२५च्या अखेरीस बँकेकडे एकूण ६१२.४ मेट्रिक टन सोन्याचा प्रचंड साठा उपलब्ध होता. या साठ्याचे तत्कालीन मूल्य ७२.२ अब्ज युरो (सुमारे ८३.६ अब्ज अमेरिकन डॉलर्स) इतके होते. बँकेच्या गव्हर्नरांनी या हस्तांतरणाचे समर्थन करताना सांगितले की, या निर्णयामुळे आमच्या सोन्याच्या साठ्याची आंतरराष्ट्रीय बाजारातील व्यापारक्षमता आणि वापराची सुलभता अधिक सुधारली आहे. हा सोन्याचा राखीव साठा प्रत्यक्ष वापरण्याची वेळ भविष्यात कधीही येऊ नये अशीच आमची इच्छा आहे.

मात्र जागतिक स्तरावर निर्माण होणाऱ्या कोणत्याही आर्थिक संकटाचा सामना करण्यासाठी आपली तयारी आणि आर्थिक लवचिकता मजबूत ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. डच बँकेने आपला अब्जावधी डॉलर्स मूल्याचा सोन्याचा साठा उत्तर अमेरिकेतून थेट लंडनमध्ये स्थलांतरित केला आहे.ह्यबँक ऑफ इंग्लंडह्लमध्ये सुरक्षित ठेवले जाणारे सोने हे आधुनिक आंतरराष्ट्रीय व्यापार मानकांची शंभर टक्के पूर्तता करते. ह्यबँक ऑफ इंग्लंडह्लमधील सोन्याचा साठा हा सर्वांत सहज, वेगाने आणि विनाअडथळा व्यापार करता येणारा साठा मानला जातो. जर भविष्यात एखादे मोठे आंतरराष्ट्रीय आर्थिक संकट उद्भवले तर डच बँकेला हा सोन्याचा साठा त्वरित आणि अत्यंत सुलभतेने वापरणे अथवा विकणे शक्य होणार आहे.

# उत्सवाला गालबोट लावू नये !

**लीलाधर दवंडे**
**कामठी, जि. नागपूर**

नुकतेच चतुर्थीला सर्वांचे लाडके दैवत गणरायाचे आगमन झाले आणि त्याबरोबरच माता गौराई सुद्धा घरोघरी मांडण्यात आली. मनोभावे पूजन करून दुसऱ्या दिवशी गौराईचे विसर्जन करण्यात आले. आनंद घेऊन येणाऱ्या बाप्पाच्या पार्थिव मूतीर्चे अनंत चतुर्दशीला विसर्जन करण्यात येईल. मात्र, या आनंदात नुकतेच मिठाचा खडा पडावा अशी घटना काटोल तालुक्यातील झिल्पा तलावात गौराई विसर्जना दरम्यान घडली. झिल्पा तलावात अनेकदा बुडून मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत त्यामुळे यापासून दक्ष असावे असे अनेकदा सांगितले जाते. मात्र, अती पुढे पुढे करणारी मुलं याकडे दुर्लक्ष करतात आणि प्रसंगी आपला जीव गमावून बसतात. मागे उरतो तो कुटुंबीयांचा न बघावणारा आक्रोश.

काटोल पोलिस ठाण्याच्या हद्दीतील झिल्पा तलाव येथे गावातील काही महिला मंगळवारी गौरी विसर्जनासाठी गेल्या. त्यांच्यासोबत दर्शन लाड आणि आयूष कुमरे ही किशोरवयीन मुलं सुद्धा तलावावर गेली. तलावातील पाण्यात उतरण्याचा मोह त्यांना आवरता आला नाही. परिणामी पाण्याचा अंदाज चुकल्याने दोघाही खेळाडूंचा बुडून मृत्यू झाला. आता जेव्हा जेव्हा गौराई विसर्जन येईल घरच्यांना शोक अनावर होत जाईल. झिल्पा



तलावात घडलेली ही दुर्घटना राज्यातील पहिली घटना नाहीच. दरवर्षी गणपती विसर्जन असो नाहीतर दुर्गा विसर्जन असो, असा आततायीपणा कित्येकांच्या जीवावर उठतो. तरीसुद्धा पुढल्या वर्षी तसेच चित्र असते आणि पुन्हा कुणाच्या घरचा जीव पाणी हिरावून घेते.

सध्या कित्येक तलावांत गाळ साचलेला आहे. शिवाय नद्यांचे अवैध वाळू तस्करांनी उत्खनन केल्याने कित्येक जागी डोह निर्माण झाले आहेत. जिथे पट्टीचे पोहणारे गटांगळ्या खाऊ लागतात तिथे हवश्या गवश्यांचा कुठे टिकाव लागणार?

२०२४ मधील गणपती विसर्जनाला कित्येक दुर्घटनांचे गालबोट लागून राज्यात तब्बल १५ जणांचा मृत्यू झाला होता. गणपती म्हणजे आनंद उत्सव. मात्र, या उत्सवात अती मोह जिवाला जडतो आणि अती उत्साहात मुलं अंदाज न घेता सरळ खोल पाण्यात उतरतात. ही घाई मात्र त्यांचा श्वास आवळून घेते, हे या कार्यकर्त्यांना कधी समजणार? मागे अचलपूर तालुक्यातील ईसापूर शहापूर येथील सार्वजनिक गणेश मंडळाचा गणपती विसर्जनासाठी पूर्णा नदीवर आणला असता पाण्याचा अंदाज न आल्याने तीन कार्यकर्त्यांचा बुडून मृत्यू झाला होता. धुळे जिल्ह्यातील एकलव्य मित्र मंडळाच्या गणपती विसर्जन मिरवणुकीत तर चक्क ट्रॅक्टर घुसून तिघांचा बळी घेतला होता. लोणार तालुक्यातील गोत्रा येथेही विसर्जनासाठी गेलेल्या अक्षय मसुरकर या १२ वीतील विद्यार्थ्यांचा तलावात बुडून मृत्यू झाला होता.

सध्या राज्यात डॉल्बीवरून रणकंदन माजते आहे. प्रचंड संखेने लोकं याला विरोध करते आहे तिथेच काही कार्यकर्ते डॉल्बीचे समर्थन करतांना दिसत आहे. या डॉल्बीच्या भिंतीवर बसलेल्या कित्येक कार्यकर्त्यांना आजपर्यंत वर लोंबकळणाऱ्या विजेच्या तारांचा स्पर्श होऊन दुर्घटना घडल्या आहेत. त्यामुळे आनंदाचा सोहळा असलेल्या बाप्पाच्या उत्सवात विविध सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम राबवून समाजहिताचे कार्य करायला हवे. नुसता आततायीपणा करून बाप्पाच्या उत्सवाला गालबोट लागणार नाही, याची काळजी गणेश मंडळांनी घ्यायला हवी.

– ८४१२८७७२२०

# ब्रिक्सचा मंच आणि मोदींचे 'ग्लोबल साउथ' कार्ड

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

नवी दिल्ली येथील भारत मंडपम येथे आयोजित १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसनशील देशांचा आवाज उठवण्यासाठी 'ग्लोबल साउथ' चे कार्ड अत्यंत प्रभावीपणे वापरले आहे. या जागतिक मंचावर भारताने स्वतःला 'ग्लोबल साउथ'चा खंबीर आवाज म्हणून सादर केले असून, सध्याच्या जागतिक व्यवस्थेत मोठ्या बदलांची मागणी केली आहे

भारताच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली येथे पार पडलेल्या ब्रिक्स शिखर परिषद २०२६ च्या पार्श्वभूमीवर भारताने ग्लोबल साउथ ची भूमिका अधिक आक्रमक आणि प्रभावीपणे जगासमोर मांडली.

ग्लोबल साउथ म्हणजेच आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील विकसनशील देशांनी जागतिक व्यासपीठावरून जगाला सर्वसमावेशकता, समानता आणि जागतिक निर्णयप्रक्रियेत सुधारणा करण्याचा स्पष्ट संदेश दिला आहे. विशेष म्हणजे ग्लोबल साउथचा हा संदेश जागतिक राजकारणात एका नव्या पर्वाची सुरुवात करत असून विकसनशील देश आता जागतिक अजेंडा ठरवण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

पूर्वी जागतिक निर्णय प्रक्रियेवर केवळ पाश्चात्य किंवा विकसित देशांचे (ग्लोबल नॉर्थ) वर्चस्व असायचे. आता भारत, ब्राझील, दक्षिण आफ्रिका यांसारखे देश ग्लोबल साउथचे नेतृत्व करत अजेंडा निश्चित करत आहेत. भारताच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जी-२० परिषदेत 'आफ्रिकन युनियन'ला मिळालेले स्थायी सदस्यत्व हे ग्लोबल साउथच्या वाढत्या ताकदीचे सर्वात मोठे उदाहरण आहे.

जगातील निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत विकसनशील देशांचा आवाज अधिक ठळकपणे ऐकू यायला हवा यासाठी जागतिक कारभारातील सध्याची विशेष अधिकाराची उतरंड बदलून भागीदारीचे व्यासपीठ



उभारण्याची गरज असल्याचे ठाम प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ब्रिक्स शिखर परिषदेच्या उद्घाटनपर भाषणात केले. एवढेच नव्हे तर जगातील संकटाचा सर्वाधिक परिणाम ग्लोबल साऊथ वर होत असताना या देशांना निर्णय घेताना पुरेसे महत्त्व मिळत नाही ही परिस्थिती बदलून प्रत्येक देशाला समान संधी आणि भूमिका मिळावी असे देखील मोदींनी आपल्या भाषणातून मत मांडले.

ग्लोबल साउथ आता केवळ आपल्या चिंता किंवा मागण्या मांडणारा गट राहिलेला नाही, तर तो जागतिक समस्यांवर ठोस उपाय शोधणारा भागीदार बनला आहे. नियम पाळणारे नाही. ग्लोबल साउथला आता फक्त विकसित देशांनी बनवलेले नियम पाळण्यात रस नाही, तर भविष्यातील तंत्रज्ञान, व्यापार आणि जागतिक धोरणांचे नियम बनवण्यात बरोबरीची भागीदारी हवी आहे,असे मोदींनी सांगितले. सध्याच्या जागतिक व्यवस्थेत सत्ता आणि निर्णय प्रक्रिया काही देशांच्या हाती आहे या निर्णयाचा परिणाम मात्र अनेक देशांना भोगाव लागतो ग्लोबल साऊथ अनेक जागतिक संकटाचा थेट सामना करीत असताना अनेक निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत मात्र मागे आहे हे नियम बदलण्याची संधी विकसनशील देशांना हवी असे मोदींनी सांगितले.

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँक यांसारख्या पाश्चात्य देशांचा वरचष्मा असलेल्या संस्थांमध्ये तातडीने सुधारणा करून विकसनशील देशांना मोठे प्रतिनिधित्व देण्याची मागणी करण्यात आली आहे.

जगातील आर्थिक आणि राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. जग आता कोणत्याही एका किंवा दोन देशांच्या प्रभावाखाली न राहता बहुध्रुवीय बनत चालले आहे, ज्यामध्ये विकसनशील देशांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. दरम्यान,भारताने आपली डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा हे कमी खर्चात आणि शाश्वत विकासाचे मॉडेल म्हणून जगासमोर सादर केले आहे.

थोडक्यात, ग्लोबल साउथचे देश आता कोणत्याही महासत्तेच्या दबावाखाली न येता, स्वतःच्या हिताचे आणि न्याय्य बाजूचे स्वतंत्र धोरण स्वीकारत आहेत.थोडक्यात सांगायचे तर, हा बदल जागतिक राजकारणातील सत्तेचे केंद्र केवळ पश्चिमेकडून सरकून अधिक लोकशाही आणि सर्वसमावेशक बनत असल्याचे संकेत देतो. विकसनशील देश आता केवळ 'श्रोते' राहिलेले नसून, जागतिक व्यवस्थेचे 'रचनाकार' बनत आहेत.

– ९५६१५९४३०६

# मोहसिन नक्वी पाकिस्तान बरोबरच आशिया चषक स्पर्धाही संपवणार?

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

जागतिक क्रिकेटच्या नकाशावर पाकिस्तान क्रिकेट बोडार्ची (पीसीबी) अवस्था आज अशा एका जहाजासारखी झाली आहे, ज्याचे सुकाणू एका राजकीय वादळाच्या हाती आहे. या जहाजाचे कॅप्टन आहेत सय्यद मोहसिन रझा नक्वी. एकाच वेळी देशाचे गृहमंत्री, पंजाबचे माजी काळजीवाहू मुख्यमंत्री, पीसीबीचे सर्वेसर्वा आणि आशियाई क्रिकेट परिषदेचे (एसीसी) अध्यक्षपद भूषवणारे मोहसिन नक्वी हे पाकिस्तानच्या क्रीडा जगतातील सर्वात वादग्रस्त व्यक्तिमत्त्व ठरले आहेत. सत्ता, लष्कराचा वरदहस्त आणि प्रशासकीय मुजोरपणा यांच्या जोरावर क्रिकेट चालवण्याचा त्यांचा अट्टाहास केवळ पाकिस्तान क्रिकेटच्या मुळावर आलेला नाही, तर आशिया खंडातील क्रिकेटची सर्वात प्रतिष्ठित स्पर्धा असलेल्या आशिया चषकालाही मृत्यूच्या दाढेत ढकलत आहे.

क्रिकेट हा कौशल्याचा, संयमाचा आणि मुत्सद्देगिरीचा खेळ आहे. मात्र, नक्वी त्याला राजकीय रणमैदान आणि टीआरपीसाठी चालवल्या जाणाऱ्या नौटंकीसारखे हाताळत आहेत. स्वतःच्या राजकीय अस्तित्वासाठी घेतलेले आक्रमक आणि अविवेकी निर्णय पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय स्तरावर एकाकी पाडत असून, आशिया चषक ही बहुराष्ट्रीय स्पर्धा कायमची इतिहासजमा होण्याच्या मार्गावर आणून ठेवली आहे.

### एका खुर्चीत दोन तलवारीः क्रिकेट प्रशासक की राजकीय बाहुले?

मोहसिन नक्वी यांची पीसीबीच्या अध्यक्षपदी झालेली निवड ही कोणत्याही क्रीडाविषयक गुणवत्तेवर झालेली नव्हती. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि लष्कराच्या डीप स्टेट यंत्रणेशी असलेल्या घनिष्ठ संबंधांमुळे त्यांना हे पद बक्षीस म्हणून मिळाले. मात्र, खरी शोकांतिका तेव्हा सुरू झाली जेव्हा त्यांनी पाकिस्तानचे केंद्रीय गृहमंत्री म्हणून शपथ घेतली आणि तरीही क्रिकेट बोर्डाची सूत्रे सोडण्यास नकार दिला.

क्रिकेटच्या इतिहासात अशी कोणतीही उदाहरणे नाहीत जिथे अंतर्गत सुरक्षा, दहशतवादविरोधी कारवाया आणि कायदा व सुव्यवस्था सांभाळणारा मंत्री एका राष्ट्रीय क्रिकेट बोर्डाचा अध्यक्ष असतो. नक्वी एका हातात देशाच्या सुरक्षेची सूत्रे आणि दुसऱ्या हातात क्रिकेटची बॅट घेऊन बसले आहेत. परिणामी, क्रिकेटच्या प्रत्येक निर्णयावर त्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेचा आणि इस्लामाबादच्या अंतर्गत राजकारणाचा थेट प्रभाव पडू लागला. जेव्हा भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) खेळाडूंच्या सुरक्षेचा आणि राष्ट्रीय धोरणाचा दाखला देत पाकिस्तान दौऱ्यास नकार दिला, तेव्हा मुत्सद्देगिरीने मार्ग काढण्याऐवजी नक्वी यांनी एका गृहमंत्र्यासारखी पोकळ भाषा वापरली. टीव्ही स्टुडिओमध्ये बसून भारताविरुद्ध आकांडतांडव करणे, बहिष्काराच्या धमक्या देणे आणि पाकिस्तानच्या सन्मानाची खोटी आवई उठवणे यापलीकडे त्यांनी काहीही केले नाही. क्रीडा प्रशासनासाठी आवश्यक असणारा मुत्सद्दीपणा बाजूला ठेवून त्यांनी रस्त्यावरच्या राजकारण्यासारखी भूमिका घेतल्यामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद आणि इतर आशियाई देशांच्या नजरेत पाकिस्तानची प्रतिमा एका अडेलतट्टू, बेजबाबदार आणि राजकीय ओलिसासारखी झाली.

### हायब्रिड मॉडेलचा पचका आणि पाकिस्तानचे आंतरराष्ट्रीय हसे

आशिया चषक आणि त्यानंतरच्या मोठ्या स्पर्धांच्या आयोजनादरम्यान नक्वी यांच्या दुटप्पी भूमिकेचा बुरखा पूर्णपणे फाटला. भारताने पाकिस्तानात जाण्यास स्पष्ट नकार दिल्यावर नक्वी यांनी सुरुवातीला "एकतर संपूर्ण स्पर्धा पाकिस्तानात होईल, नाहीतर आम्ही खेळणारच नाही", "आम्ही हायब्रिड मॉडेल कधीही स्वीकारणार नाही", आणि "आयसीसीने भारतावर दबाव आणावा, अन्यथा आम्ही कोर्टात जाऊ" अशा वल्गना केल्या. स्थानिक माध्यमांमध्ये स्वतःला 'पोलादी पुरुष' भासवणाऱ्या नक्वींची ही भाषा प्रत्यक्षात मात्र पत्याच्या बंगल्यासारखी कोसळली. बीसीसीआयने कठोर भूमिका घेत भारताशिवाय स्पर्धा भरवून दाखवण्याचे मूक आव्हान देताच नक्वींच्या पायाखालची वाळू सरकली. कारण त्यांना ठाऊक होते की, भारत नसणे म्हणजे प्रक्षेपण हक्क घेणाऱ्या वाहिन्यांचे कोट्यवधी डॉलर्सचे नुकसान, प्रायोजकांची पाठ आणि आयसीसीच्या महसूल वाटपातून पाकिस्तानचे होणारे अब्जावधी रुपयांचे नुकसान.

शेवटी नक्वी यांनी स्वतःचेच शब्द गिळले आणि मानहानीकारक पद्धतीने मान तुकवून हायब्रिड मॉडेल स्वीकारले. भारताचे सर्व सामने यूएई किंवा श्रीलंकेत हलवले गेले. नक्वींच्या या पोकळ धमक्यांनी पाकिस्तानची जगभर नाचक्की केली. जर शेवटी गुडघेच टेकायचे होते, तर आधी एवढी शेखी कशासाठी मिरवली, असा जाब पाकिस्तानातील दिग्गज माजी खेळाडूंनीही विचारला. नक्वींच्या या अहंकारामुळे पाकिस्तानला ना आंतरराष्ट्रीय सन्मान मिळाला, ना पूर्ण स्पर्धेचे यजमानपद.

### आशिया चषकः सोन्याचे अंडे देणारी कोंबडी मारण्याचा घाट

आशिया चषक ही केवळ एक स्पर्धा नाही, तर आशियाई क्रिकेट परिषदेच्या अस्तित्वाची नाडी आहे. एसीसीच्या एकूण कमाईपैकी जवळपास ८५ ते ९० टक्के कमाई ही भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हाय-व्होल्टेज सामन्यांमुळे होते. याच कमाईतून बांगलादेश, श्रीलंका, अफगाणिस्तान, नेपाळ यांसारख्या छोट्या देशांच्या क्रिकेट बोर्डांना विकास निधी मिळतो. मात्र नक्वी जेव्हा एसीसीचे अध्यक्ष बनले, तेव्हा त्यांनी या तटस्थ व्यासपीठाचा वापर भारतविरोधी आणि स्वतःच्या पीसीबीच्या अजेंड्यासाठी सुरू केला.

नक्वी यांच्या काळात घडलेला सर्वात लाजिरवाणा प्रकार म्हणजे ट्रॉफी वाद. आंतरराष्ट्रीय मंचावर भारतीय संघाने नक्वी यांच्याकडून विजेतेपदाची ट्रॉफी स्वीकारण्यास थेट नकार दिला. एका बहुराष्ट्रीय स्पर्धेत एसीसीचा अध्यक्ष मंचावर उभा असताना चॅम्पियन संघ त्याच्या हातून करंडक घेत नाही, ही संपूर्ण आशियाई क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात मोठी नाचक्की होती. हा प्रसंग नक्वींच्या राजकीय उद्दामपणाला मिळालेली सणसणीत चपराक होती. या संपूर्ण प्रशासकीय सर्कशीमुळे जागतिक प्रायोजक आता आशिया चषकापासून लांब पळू लागले आहेत. ज्या स्पर्धेत खेळापेक्षा राजकीय वाद, अंतिम सामन्यातील बहिष्कार आणि श्रेयवादाची लढाई जास्त चालते, तिथे शेकडो कोटींची गुंतवणूक कोण करणार? आशिया चषकाचे व्यावसायिक मूल्य पद्धतशीरपणे नष्ट करण्याचे श्रेय थेट मोहसिन नक्वी यांच्याकडे जाते.

### आशियाई क्रिकेट परिषदेतील इतर देशांचा भ्रमनिरास

एसीसीमध्ये केवळ भारत आणि पाकिस्तान नसून श्रीलंका, बांगलादेश आणि अफगाणिस्तान यांसारखे सदस्य देशही आहेत. नक्वींच्या कार्यपद्धतीने या छोट्या देशांचे प्रचंड नुकसान केले आहे. सीमावाद आणि राजकीय तणावामुळे नक्वींच्या नेतृत्वाखालील पीसीबीने अफगाणिस्तान क्रिकेट बोडार्शी संवाद सुधारण्याऐवजी अंतर वाढवले, ज्यामुळे अफगाणिस्तानचे क्रिकेट बोर्ड भारताच्या अधिक जवळ गेले. दुसरीकडे, नक्वी जेव्हा भारत-पाक सामन्यावरून स्पर्धा अडवून धरतात, तेव्हा श्रीलंका आणि बांगलादेशच्या महसुलावर गदा येते. पावसाच्या हंगामात श्रीलंकेत सामने भरवणे किंवा दुबईच्या प्रचंड उकाड्यात स्पर्धा ढकलणे यांसारखे अवाजवी निर्णय नक्वींच्या अट्टहासापोटी लादले गेले. या मनमानीमुळे बीसीसीआय आता आशिया चषकाला पर्यायी व्यवस्था म्हणून इतर देशांसोबत त्रिकोणी किंवा चौकोनी मालिकांचा विचार करू लागली आहे. जर भारताने आशिया चषकातून अंग काढून घेतले, तर ही स्पर्धा रस्त्यावर येईल. आर्थिक केंद्र असलेला भारत बाहेर पडल्यास या स्पर्धेला स्थानिक क्लब टूर्नामेंटपेक्षा जास्त किंमत उरणार नाही, हे वास्तव नक्वींच्या आकलनाबाहेर गेले आहे.

### पाकिस्तान क्रिकेटची अंतर्गत वाताहतः सर्जरीच्या नावाखाली धूळफेक

बाहेर आंतरराष्ट्रीय स्तरावर थयथयाट करणाऱ्या नक्वींनी स्वतःच्या क्रिकेट रचनेची मात्र भयानक वाताहत केली आहे. पूर्वी आयसीसी क्रमवारीत सातत्याने अव्वल तीनमध्ये राहणारा पाकिस्तान संघ आज कसोटी आणि टी-२० मध्ये ऐतिहासिक घसरणीचा सामना करत आहे. स्वतःच्या घरच्या मैदानावर, जिथे पाकिस्तानचा बालेकिल्ला मानला जायचा, तिथे त्यांना बांगलादेशकडून कसोटी मालिकेत दोन-शून्य असा मानहानीकारक पराभव स्वीकारावा लागला.

कर्णधारपदाबाबत तर निव्वळ पोरखेळ चालवला गेला. बाबर आझमकडून कप्तानी काढून शाहीन आफ्रिदीकडे देणे, अवघ्या एका मालिकेनंतर शाहीनला हटवून पुन्हा बाबरला बसवणे आणि त्यानंतर पुन्हा राजीनाम्याची नौटंकी घडणे, यावरून बोर्डाच्या स्थिरतेची कल्पना येते. टी२० विश्वचषकातील दारुण पराभवानंतर नक्वींनी पाकिस्तान क्रिकेटमध्ये मोठी शस्त्रक्रिया करण्याची घोषणा केली होती. परंतु प्रत्यक्षात एकाच वर्षात तीन वेळा निवड समित्या बदलल्या गेल्या, खेळाडूंना विश्वासात घेण्याऐवजी त्यांच्यावर जाहीर चिखलफेक झाली आणि देशांतर्गत क्रिकेटची रचना पूर्णपणे उद्ध्वस्त करण्यात आली. त्यांच्या अहंकारामुळे गॅरी कर्स्टन यांच्यासारख्या विश्वविजेत्या परदेशी प्रशिक्षकाने अवघ्या काही महिन्यांत अंतर्गत राजकारणाला कंटाळून राजीनामा दिला.

– ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# मनपाच्या रक्तदान शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## २०१ हून अधिक युनिट रक्त संकलन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूर महानगरपालिकेच्या वतीने केंद्र व राज्य शासनाच्या सेवा संकल्प अभियान, श्रीगणेशा आरोग्याचा अभियान २०२६ आणि स्वच्छता ही सेवा अभियान अंतर्गत आरोग्य विभागाच्या माध्यमातून तेरापंथ युवक परिषद, नागपूर, अर्पण रक्तपेढी आणि रेनबो रक्तपेढी यांच्या सहकार्याने गुरुवारी (ता.१७) भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. महापौर निता ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील आणि मनपा आयुक्त डॉ. विपीन, पोलीस उपायुक्त डॉ. संदीप पखाले, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, मुख्य अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके यांनी रक्तदान करून उपस्थितांना या सेवा कायार्साठी प्रोत्साहित केले. या भव्य रक्तदान शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शवित २०१ युनिट रक्त संकलित करण्यात आले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संवैधानिक पदावरील कारकिर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने महिनाभर शहरात सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध लोकोपयोगी कार्यक्रम राबविले जाणार आहे. त्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेच्या मुख्यालयात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्ता पक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती सभापती मनीषा अतकरे, शिक्षण विशेष समिती सभापती संतोषदेवी लड्ढा, नगरसेवक शैलेश पांडे, नगरसेवक अभिजित झा, मनपा उपायुक्त राजेश भगत, वैद्यकीय आरोग्य



अधिकारी दीपक सेलोकर, अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी नरेंद्र अहिलवार, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, सार्वजनिक आरोग्य परिचारिका दिपाली नागरे, पोलीस विभागाचे पोलीस उपनिरीक्षक रवी चौधरी, नागपूर स्मार्ट सिटीचे स्वतंत्र संचालक आशिष मुकीम, तेरापंथ युवक परिषदेचे अध्यक्ष प्रियांक छाजेड, सचिव विनय अंचलिया, तनुज सेठिया, नितेश छाजेड, लव्हेश डागा, अर्पण रक्तपेढी चे संचालक सत्यम सिंग, डॉ. स्वप्नील चौरे, स्वाती जंजाड़, नंदिनी पाटणकर, सचिन कासार, रेनबो रक्तपेढीच्या संचालिका डॉ. रश्मी वर्मा, डॉ. संजय पराते, विभाग प्रमुख उज्वला दारोडकर, शीतल भेंडारकर, शिल्पा वर्षिकर तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी एआयएमआयएमचे गटनेते शकील पटेल यांनी रक्तदान केले.

शिबिरामध्ये रक्तदात्यांची नोंदणी, प्राथमिक तपासणी तसेच रक्त संकलनासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली. अर्पण रक्तपेढी आणि रेनबो रक्तपेढी यांच्या वैद्यकीय पथकाकडून रक्तदात्यांची आवश्यकता तपासणी करून सुरक्षित पद्धतीने रक्त संकलित करण्यात आले. मनपाच्या विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी आणि सर्व सामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येत रक्तदान शिबिरात सहभाग नोंदविला. सकाळी सुरु झालेल्या या शिबिरामध्ये रक्तदात्यांची गर्दी पाहायला मिळाली. शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्तपणे पुढे येत रक्तदान केले, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात रक्त संकलन करण्यात आले.

महापौर निता ठाकरे, पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील, मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांचे अभिनंदन व कौतुक केले. तसेच या शिबिरासाठी आपल्या चमू सह आलेल्या तेरापंथ युवक परिषद, अर्पण रक्तपेढी आणि रेनबो रक्तपेढीचे ही अभिनंदन व कौतुक केले. 'एक थेंब आशेचा' या संदेशातून आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिराचा उद्देश रक्ताची गरज असलेल्या रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे तसेच नागरिकांमध्ये स्वैच्छिक रक्तदानाबाबत जनजागृती निर्माण करणे हा आहे.

यावेळी तेरापंथ युवक परिषद, अर्पण रक्तपेढी आणि रेनबो रक्तपेढी यांनी या समाजहिताच्या उद्दिष्टाने राबविण्यात आलेल्या रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजना करिता महापौर निता ठाकरे, पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील, मनपा आयुक्त डॉ. विपीन यांचा स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुछ देऊन अभिनंदन केले.

## पथविक्रेता मसुद्याबाबत ३० सप्टेंबर पर्यंत हरकती व सूचना सादर कराव्या

**नागपूर :** राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थासाठी एकसमान व सर्वसमावेशक पथविक्रेता योजना तयार करण्याचा महत्त्वाचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून, यासंदर्भात गुरुवारी (ता.१७) आयुक्त डॉ. विपीन यांच्या सभा कक्षात बैठक पार पडली. बैठकीत स्थानिक प्राधिकरण व नगर पथविक्रेता समितीशी सल्ला मसलत करून पथविक्रेता योजनेबाबत येत्या ३० सप्टेंबर पर्यंत हरकती व सूचना सादर करण्याचे आवाहन आयुक्त डॉ. विपीन यांनी केले आहे.

## मोरगाव येथे जिम साहित्य उद्घाटन व श्री गणरायाचे दर्शन



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**
खात - रेवराल जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत येत असलेल्या गट ग्रामपंचायत मोरगांव येथे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या माध्यमातून गावातील तरुण व मुलांना नियमित व्यायामासाठी जिम साहित्य मंजूर करण्यात आले होते. या नूतन जिम साहित्याचा लोकार्पण व उद्घाटनाचा सोहळा माजी जिल्हा परिषद सदस्या राधा मुकेश अग्रवाल यांच्या हस्ते अतिशय उत्साहात पार पडला. या उपक्रमामुळे गावातील युवकांना आरोग्याची जोपासना करण्यासाठी उत्तम सुविधा उपलब्ध झाली आहे. याप्रसंगी अग्रवाल दांपत्याने मोरगांव येथील बाल गणेश उत्सव मंडळ यांच्या वतीने स्थापित करण्यात आलेल्या लाडक्या बाप्पाचे (गणरायाचे) मनोभावे दर्शन घेऊन सर्वांच्या सुख, समृद्धी आणि आरोग्यासाठी प्रार्थना केली. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य खात-रेवराल सर्कल राधा मुकेश अग्रवाल, माजी तालुका अध्यक्ष मौदा मंडळ मुकेश अग्रवाल, तंटामुक्त अध्यक्ष प्रकाश नन्होरे, गट ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र गडे,फागो साठवणे, प्रदीप बांगरे,महादुले ,धुरपता भोयर, प्रियंका बांगरे, ग्रामपंचायत ऑपरेटर कमलेश भोयर, ग्रामपंचायत कर्मचारीवृंद परमेश्वर उके, सुरेश बोरकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष विनोद वाघमारे,गिरधर विरुद्ध, गुलशन नन्होरे, सागर बावणे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे स्वीय सहाय्यक अश्विन गुरुभेले आणि गावातील सर्व सामान्य नागरिक. परिसरातील तरुण, ग्रामस्थ आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महानगरपालिका शिक्षण विभागात नवा पुढाकार

### २९ वर्षांपासून प्रलंबित डेटा अपडेट, भरती प्रक्रियेला गती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात पवित्र पोर्टलशी संबंधित डेटा अपडेट करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण प्रगती झाली आहे. सन १९९७ ते मार्च २०२६ या कालावधीपासून जवळपास २९ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या कामाला आता गती मिळाली आहे.

शिक्षकांची नियुक्ती, सेवानिवृत्ती तसेच सेवेशी संबंधित आवश्यक माहिती वेळोवेळी पोर्टलवर अपडेट न झाल्यामुळे शिक्षक भरती प्रक्रियेत दीर्घकाळापासून व्यावहारिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन महापौर निता ठाकरे यांच्या मार्गदर्शनात तसेच शिक्षण सभापती संतोष देवी दीपक लद्धा यांच्या पुढाकाराने, सातत्यपूर्ण समन्वय आणि पाठपुराव्यामुळे शिक्षण विभागाने या कामाला प्राधान्याने पुढे नेले.

सातत्याने केलेल्या प्रयत्नांच्या परिणामस्वरूप इयत्ता ९ वी आणि १० वीशी संबंधित पवित्र पोर्टलचा आवश्यक डेटा अपडेट करून प्रलंबित माहिती नोंदविण्याचे महत्त्वपूर्ण काम पूर्ण झाले आहे. यामुळे शिक्षक भरती प्रक्रिया पुढे नेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रक्रियेच्या परिणामस्वरूप पहिल्या टप्प्यात १४ शिक्षकांना नियुक्तीपत्रे देण्यात आली आहेत. तसेच ३ शिक्षकांची स्क्रुटिनी प्रक्रिया सुरू आहे, तर उर्वरित ४० पदांची भरती प्रक्रिया पुढील टप्प्यात संबंधित शाळांसाठी पुढे नेण्यात येणार आहे.

यासोबतच माध्यमिक विभागातील उर्वरित डेटा देखील वेगाने अपडेट करण्याचे काम सुरू असून, ते आगामी सुमारे एका महिन्यात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. प्राथमिक विभागातील पवित्र पोर्टल डेटा अपडेट करण्याचे कामही सुरू करण्यात आले आहे.

## स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना दिशादर्शन

### हजरत बाबा ताजुद्दीन महाविद्यालयात एकदिवसीय कार्यशाळा, डॉ. प्रमोद लाखे यांचे मार्गदर्शन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून प्रशासकीय सेवा तसेच विविध शासकीय क्षेत्रांत करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनापासूनच नियोजनबद्ध व सातत्यपूर्ण अभ्यासाला सुरुवात करावी, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य भारतीय प्रशासकीय सेवा कोचिंग सेंटर, नागपूरचे संचालक डॉ. प्रमोद लाखे यांनी केले.

हजरत बाबा ताजुद्दीन आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, ताजाबाद शरीफ, उमरेड रोड, नागपूर येथे स्पर्धा परीक्षांबद्दल जागरूकता व त्याची तयारी, या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. हजरत बाबा ताजुद्दीन कॉलेज, यशोदा गर्ल्स आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, अंजुमन कॉलेज तसेच उम्मे सलमा



विज्ञान व कला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळा पार पडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शादाब एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अब्दुल सलीम अब्दुल जब्बार होते. प्रमुख अतिथी म्हणून सोसायटीचे सचिव मोहम्मद शादाब अब्दुल सलीम, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वाणिज्य अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. तुषार चौधरी, प्राचार्य डॉ. मनिष बिहाडे, डॉ. अमोल राऊत यांच्यासह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य उपस्थित होते.

प्रास्ताविकात हजरत बाबा ताजुद्दीन कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शकील सत्तार यांनी स्पर्धात्मक युगातील विविध करिअरच्या संधी, स्पर्धा परीक्षांचे वाढते महत्त्व आणि योग्य वेळी तयारी सुरू करण्याची आवश्यकता यावर मार्गदर्शन केले. डॉ. लाखे यांनी एमपीएससी, यूपीएससी व इतर स्पर्धा परीक्षांची तयारी, अभ्यासक्रमाचे आकलन, संदर्भ साहित्याची निवड, वेळेचे नियोजन, चालू घडामोडींचा अभ्यास, नियमित सराव, सराव परीक्षा व लेखन कौशल्य याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यशासाठी बुद्धिमत्ते बरोबरच नियोजन, सातत्य, संयम आणि सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न उपस्थित केले. डॉ.लाखे यांनी त्यांच्या शंकांचे निरसन केल्याने स्पर्धा परीक्षांची तयारी कशी व कोणत्या टप्प्यावर सुरू करावी, याबाबत विद्यार्थ्यांना स्पष्ट दिशा मिळाली.

कार्यक्रमाचे संचालन डॉ.जरीना खान यांनी तर आभार प्रा.नेहा शेख यांनी मानले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी डॉ. शकील सत्तार यांच्यासह चारही महाविद्यालयांतील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभलेल्या या कार्यशाळेमुळे स्पर्धा परीक्षांविषयी जागरूकता निर्माण होऊन विद्यार्थ्यांना अभ्यासाची दिशा व करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन मिळाले.

# चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्यातील उद्योगांना सुरळीत वीजपुरवठा देण्यास महावितरण कटिबद्ध, संचालक औंढेकर यांची ग्वाही

### चंद्रपूर एमआयडीमध्ये ११ केव्ही वीजवाहिनीच्या विभाजनाला मान्यता

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
औद्योगिक ग्राहक हा महावितरणच्या महसूलाचा मुख्य कणा आहे. वीजपुरवठ्याच्या समस्येमुळे कोणत्याही उद्योगाला फटका बसू नये हीच महावितरणची प्राथमिकता आहे. उद्योजकांना तत्पर आणि दर्जेदार वीजपुरवठा देण्यासाठी महावितरण कटिबद्ध असून त्यासाठी क्षेत्रीय कामकाजात अधिक सुसूत्रता व सुलभता आणली जाईल, अशी ग्वाही महावितरणचे संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी दिली.



दरम्यान, यावेळी चंद्रपूर एमआयडीसी संघटनेच्या मागणीची तात्काळ दखल घेत संचालक औंढेकर यांनी चंद्रपूर एमआयडीसीमधील ३३/११ केव्ही उपकेंद्रातील ११ केव्ही वीजवाहिनीचे विभाजन करून दोन वीजवाहिन्यांद्वारे सुरळीत व दर्जेदार वीजपुरवठा करण्याचा प्रस्ताव मान्य केला. मंजुरीसाठी हा प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

चंद्रपूर येथील परिमंडल कार्यालयात शनिवारी (दि. १२) आयोजित बैठकीत चंद्रपूर व गडचिरोली एमआयडीसी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांशी संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी थेट संवाद साधला. या बैठकीत त्यांनी उद्योजकांच्या विविध समस्या ऐकून घेतल्या आणि त्याच्या तात्काळ निराकरणासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. यावेळी मुख्य अभियंता. हरिश गजबे, अधीक्षक अभियंता मनोज धाबर्डे (चंद्रपूर) व प्रकाश खांडेकर (गडचिरोली), रमेश सानप (इन्फ्रा), एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष मधुसूदन रूंगटा (चंद्रपूर) आणि अतुल बोमनवार (गडचिरोली) यांची प्रमुख उपस्थिती होती.

औंढेकर पुढे म्हणाले की, औद्योगिक ग्राहकांना सुरळीत व दर्जेदार वीजपुरवठा मिळावा यासाठी स्थानिक वीजयंत्रणेच्या आवश्यक सक्षमीकरणाची कामे वेगाने पूर्ण करण्यावर भर राहील. राज्यातील सौर ऊर्जा क्रांतीमुळे औद्योगिक ग्राहकांवरील क्रॉस सबसिडीचा बोझा कमी झाल्याने तसेच वीज खरेदीमध्ये मोठी बचत सुरू असल्याने औद्योगिक व व्यावसायिक वीज दर कमी होत जाणार आहे. तसेच सौर ऊर्जेमुळे दिवसा घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांना वीजदरात सवलत मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

या संवाद कार्यक्रमात चंद्रपूर व गडचिरोली एमआयडीसी मधील औद्योगिक ग्राहकांच्या विविध मागण्या व अपेक्षांवर चर्चा झाली. संचालक (संचालन) औंढेकर यांनी स्थानिक वीजप्रश्नांचे तातडीने निराकरण करण्याची सूचना केली. या बैठकीला चंद्रपूर व गडचिरोली एमआयडीसी औद्योगिक संघटनेचे पदाधिकारी, कार्यकारी अभियंता सुहास पडोळे (चंद्रपूर), महेशचंद्र तेलंग (बल्लारशाह), विलास नवघरे (वरोरा), हितेश पारेख (गडचिरोली), जितेंद्र वाघमारे (आलापल्ली), भारतभूषण औघड (ब्रह्मपुरी) यांच्यासह अभियंते व अधिकारी उपस्थित होते.

**थोडक्यात**

## पाच तासांत चोरीचा गुन्हा उघड, सोन्याची अंगठी जप्त

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
घरातून चोरीला गेलेली ३.७ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी अवघ्या पाच तासांत हस्तगत करून भिवापूर पोलिसांनी चोरीचा गुन्हा उघडकीस आणला. या प्रकरणी मनोहर धनराज शंभरकर (४१) याला ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्याकडून सुमारे ३५ हजार रुपये किमतीची अंगठी जप्त करण्यात आली. खोलदोडा येथील अरुण वासुदेव मांडवकर (६०) यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. १३ सप्टेंबर रोजी सकाळी त्यांची पत्नी नागपूर येथे मुलीकडे गेल्यानंतर मांडवकर हे घरी एकटे होते. दुसऱ्या दिवशी घरातील ३.७ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याप्रकरणी भिवापूर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५ (अ) व ३३१ (४) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

तपासादरम्यान मांडवकर यांचा मामेभाऊ मनोहर शंभरकर हा १४ सप्टेंबर रोजी दुपारी घरातून लपतछपत बाहेर पडताना दिसल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवून त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्याच्याकडून चोरीची सोन्याची अंगठी जप्त करण्यात आली. पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार, अपर पोलिस अधीक्षक अनिल म्हस्के, सहायक पोलिस अधीक्षक तथा उपविभागीय पोलिस अधिकारी मयंक माधव यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार रविंद्र मस्कर यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली.

## नगरसेवक पिंटू झलके यांनी उचलला जन्म आणि मृत्यू नोंदणीचा मुद्दा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
जन्म आणि मृत्यू नोंदणीतील प्रचंड विलंब आणि सामान्य नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी हा मुद्दा महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत चर्चेचा मुख्य विषय ठरला. बुधवारी महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान, ज्येष्ठ नगरसेवक पिंटू झलके यांनी जन्म आणि मृत्यू नोंदणीतील विलंबामुळे निर्माण होणाऱ्या असंख्य अडचणींचा मुद्दा उपस्थित केला. चर्चेदरम्यान, पिंटू झलके यांनी विभागाच्या कार्यपद्धतीचा पदार्फाश केला. त्यांनी सांगितले की, दररोज ७०-८० नवीन अर्ज प्राप्त होण्याच्या तुलनेत केवळ ३०-३५ अर्जांवरच प्रक्रिया केली जात आहे.

केंद्रीय सीआरएस पोर्टलवर मुख्यालय स्तरावर केवळ एकच लॉगिन उपलब्ध असल्याने संकट अधिकच गंभीर झाले आहे. यापूर्वी, विभागीय स्तरावर लॉगिन उपलब्ध होते, ज्यामुळे विभागीय स्तरावरील नोंदणीच्या समस्या सुटल्या होत्या. त्यांनी पुढे सांगितले की, प्रमाणपत्राअभावी एका खेळाडूला रणजी संघात खेळण्यापासून रोखण्यात आले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, हे अर्ज मंजूर करण्यासाठी दहावी उत्तीर्ण झालेल्या वर्ग ३ च्या कर्मचाऱ्यांना उपनिबंधक पदाचा कार्यभार देण्यात आला आहे. प्रशासनाने सांगितले की, मुख्यालयात केवळ १० कर्मचारी आणि विभागांमध्ये प्रत्येकी दोन कर्मचारी तैनात आहेत.

## तालुकास्तरीय कबड्डीत राष्ट्रीय विद्यालयाचा दबदबा!

### २५ संघांचा सहभाग; १४, १७ व १९ वर्षे वयोगटात विविध संघांनी पटकावले विजेतेपद




**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तथा नागपूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या अंतर्गत आयोजित तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेत विद्यार्थ्यांनी चांगलाच दम दाखविला. गुरुवारी (१७) भिवापूर महाविद्यालयाच्या मैदानावर रंगलेल्या या स्पर्धेत तब्बल २५ संघांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी गटशिक्षणाधिकारी संतोष सोनटक्के यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी प्रीती नायर होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून पंढरी हिवसे, शंकर डडमल, सुधाकर कोळसे, बाबा माळवे तसेच तालुका क्रीडा संयोजक कोहिनूर वाघमारे उपस्थित होते. १४ वर्षे वयोगट मुलांच्या गटात राष्ट्रीय विद्यालय, भिवापूर, तर मुलींच्या गटात भिवापूर एज्युकेशन सोसायटी बॉईज हायस्कूलने विजेतेपद मिळविले. १७ वर्षे वयोगटातील मुला-मुलींच्या दोन्ही गटांत राष्ट्रीय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली. १९ वर्षे वयोगटातील मुला-मुलींच्या गटात भिवापूर महाविद्यालय विजयी ठरले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी आदित्य सार्वे, निखील नखाते, शोगन धांडे, मृणाली ब्रम्हे, संजय मंदे, अनिल वाघमारे, शिवनकर, वाणी, जिभकाटे, तिरपुडे, किशोर अलोने, श्रीकृष्ण चाचरकर तसेच शिवाजी क्रीडा मंडळ यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन ज्योती बांते यांनी केले, तर आभार देवेंद्र गोवर्धन यांनी मानले.

## खात येथे महालक्ष्मीची स्थापना

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**
घरोघरी गणरायाचे आगमन झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी ऋषीपंचमी आणि त्यानंतर होते ते गौरी आवाहन. गौरीपूजन हे देखील भाद्रपद



महिन्यातील महत्त्वाचे व्रत आहे. जेष्ठ गौरीचे प्रत्येकाकडे आपापल्या परंपरेनुसार पूजन होते. यंदा गुरुवार(१७ सप्टेंबर ) ला गौरी आवाहन करण्यात आले. त्यानुसार मौदा तालुक्यातील विविध गावात महालक्ष्मीची स्थापना करण्यात आली. खात येथे मागील १०५ वर्षापासून लीलाधर शामराव कुर्वे यांच्याकडे महालक्ष्मीची स्थापना करण्यात येत होती. यंदा १०६ व्या वर्षीही लीलाधर शामराव कुर्वे यांच्याकडे महालक्ष्मीची स्थापना करण्यात आलेली आहे.

थोडक्यात

## बांधकाम पूर्ण झालेल्या निमखेडा रेल्वे क्रॉसिंगवरील उड्डानपूल सुरू करण्याची नितीन गडकरी यांना मागणी

### विलंब करणाऱ्या संबंधित कंत्राटदार व रेल्वे अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू: मौदा**

चाचेर - निमखेडा जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत येणाऱ्या निमखेडा येथे रेल्वे क्रॉसिंग वर मागील दीड वर्षापासून उडान पुलाचे बांधकाम पूर्ण झाले असून, मात्र अद्यापही उड्डाणपूल सुरू न झाल्याने, तांत्रिक कारणाअभावी विलंब होत असल्यास त्या तांत्रिक अडचणी दूर करून उडान पूल सुर करण्यासाठी, जर काहीही तांत्रिक अडचण नसेल तर विनाकारण विलंब करीत असलेल्या संबंधित कंत्राटदार व रेल्वे विभागातील अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी चाचेर मंडळातर्फे केंद्रीय सडक परिवहन व राजमार्ग मंत्री नितीन गडकरी यांना रविवार (ता.१३ सप्टेंबर)ला नागपूर येथील गडकरी वाडा येथे जनसंपर्क कार्यक्रम दरम्यान निवेदन देण्यात आले.

मागील अनेक वर्षापासून या रेल्वे फाटकामुळे दररोज शेकडो वाहनधारक, शाळकरी विद्यार्थी कमालीचे त्रस्त राहत असल्याने गडकरी यांनी तात्काळ तक्रारीची दखल घेत प्रशासनाला धारेवर घेतले आणि त्या कामाची लवकरच सभा लावून त्यावर तोडगा काढून देण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी निवेदनकर्ते चाचेर मंडळाचे अध्यक्ष रवींद्र चव्हाण, भाजपा किसान आघाडीचे जिल्हा महामंत्री तथा ग्रामपंचायत खंडाळा (गांगणेर)सरपंच संकेत झाडे, माजी उपसभापती खेमराज चाफले, डॉ. दिनेश बादोले, अशोक बावनकुळे,निमखेडा ग्रामपंचायतचे सदस्य आक्रोश पानतावणे, उमेश शेंडे व कार्यकर्ते उपस्थित होते.

## टोल-चेकपोस्ट चुकवण्यासाठी ग्रामीण रस्त्याचा वापर?

### मरारवाडी-भोंदेवाडा मार्गावर अवजड वाहनांचा हैदोस, ग्रामस्थ संतप्त



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील टोल व चेकपोस्ट टाळण्यासाठी मरारवाडी-भोंदेवाडा,भिलेवाडा येथील ग्रामीण मागार्चा अवजड वाहनांसाठी वापर केला जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. काही स्थानिक व्यक्तींकडून वाहनचालकांना ग्रामीण मार्गाने वाहने काढून दिली जात असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली. दिवस-रात्र मोठे ट्रक व अवजड वाहने गावातील अंतर्गत रस्त्याने धावत असल्याने रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. ठिकठिकाणी खड्डे पडल्याने नागरिक, विद्यार्थी, दुचाकीस्वार व पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. कालही अवजड वाहनांची वाहतूक सुरू असल्याचे निदर्शनास आल्यानंतर संतप्त ग्रामस्थांनी वाहने अडवून विरोध नोंदविला. मात्र, केवळ वाहने अडवून हा प्रश्न सुटणार नसून, या वाहतुकीमागील प्रकाराची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

**अवजड वाहतूक तात्काळ बंद करा : रोहित सायरे**

मरारवाडी-भोंदेवाडा ग्रामीण मार्गावरून सुरू असलेल्या अवजड वाहनांमुळे रस्त्याची दुरवस्था झाली असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर झाला आहे. टोल व चेकपोस्ट टाळण्यासाठी हा मार्ग वापरला जात असल्याच्या तक्रारींची प्रशासनाने सखोल चौकशी करून अवजड वाहतूक तात्काळ बंद करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते रोहित सायरे यांनी केली आहे.

## महापौर निता ठाकरे यांच्या हस्ते "स्वच्छता ही सेवा" अभियानाचा शुभारंभ




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा २०२६' अभियानाचा शुभारंभ आज(ता.१७) झोन क्र. ५, प्रभाग क्र. २६, आदर्श नगर, बुद्ध विहारजवळ, नागपूर येथे विशेष स्वच्छता व सौंदर्यीकरण उपक्रमाद्वारे करण्यात आला. या अभियानाचा शुभारंभ महापौर निता ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी नगरसेवक विजय( पिंटू) झलके, विभागीय अधिकारी आनंद खोडस्कर, पीआययु चमूचे सदस्य तसेच स्थानिक नागरिक यांचा उत्स्फूर्त सहभाग व सहकार्य लाभले. स्वच्छतेत सहभाग, स्वच्छ भारत, विकसित भारत,या संकल्पनेवर आधारित या अभियानात शुभारंभा प्रसंगी स्थानिक जीव्हीपी पॉईंटवर विशेष स्वच्छता व सौंदर्यीकरण मोहीम राबविण्यात आली. या ठिकाणी आकर्षक भित्तीचित्रे व संकल्पनेवर आधारित रांगोळी साकारून परिसराला स्वच्छ, सुंदर व आकर्षक स्वरूप देण्यात आले. तसेच स्वच्छता ही सेवा २०२६ अभियानाशी संबंधित जनजागृतीपर संदेशांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली.

# सेवा संकल्प अभियानाच्या अंमलबजावणीसाठी समन्वयाने नियोजन करा!

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सामान्य नागरिकांपर्यंत शासकीय योजनांचे लाभ पोहोचवण्यासाठी सेवा संकल्प अभियानाचे नियोजन करताना संबंधित विभागांनी आपसात समन्वय ठेवण्याच्या सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

राज्य शासनाच्या परिपत्रकानुसार १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यभरात सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी संबंधित सर्व अधिकाऱ्यांची बैठक घेऊन अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले.

बैठकीस वनविभागाचे सहायक वनसंरक्षक यश काळे, अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रवीण महिरे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे यांच्यासह शिक्षण विभाग, कृषी विभाग, जिल्हा महिला व बालविकास, भूमी अभिलेख, समाज कल्याण आणि महावितरण विभागाचे अधिकारी उपस्थित होते. सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व नायब तहसीलदार दूरदृश्य संवादप्रणालीद्वारे बैठकीस उपस्थित होते.

प्रत्येक तालुका स्तरावर सेवा सेतू अभियानांतर्गत विशेष शिबिरांचे आयोजन करावे. केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचे थेट



लाभ पात्र नागरिकांना त्वरित उपलब्ध करून द्यावेत. ह्यआपले सरकारह्ण केंद्रांवर अर्ज प्रक्रिया सुलभ व जलद करण्यासाठी केंद्रावरच अर्ज भरून घेऊन शिबिराच्या ठिकाणीच थेट लाभ हस्तांतरित करावा. महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार प्रत्येक तालुक्यात किमान एका ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर आयोजित करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

या कालावधीत तालुकास्तरावर सेवा सेतू शिबिरात वन हक्क दावे स्वीकारावेत. मुख्यमंत्री बळीराजा योजनेअंतर्गत पाणंद रस्ते उपलब्ध करणे, पात्र लाभार्थ्यांना शिधापत्रिकांचे वितरण, मालमत्ता हस्तांतरणाच्या नोंदी घेणे, नळ जोडणी, महिला बचत गटांची नोंदणी, दिव्यांगांना प्रमाणपत्र देणे, तसेच बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेअंतर्गत सिंचन विहिरींसाठी अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी करावी. तसेच जमिनीच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार आणि सातबाराच्या नोंदी अद्ययावत कराव्यात व लाभार्थ्यांना तात्काळ प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याच्या सूचना आशीर्वाद यांनी यावेळी केल्या.

सेवा संकल्प अभियानात विविध उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. त्यात शैक्षणिक संस्था, स्टार्टअप नेटवर्क व खासगी कंपन्यांच्या सहभागातून युवा व विद्यार्थ्यांना इनोव्हेशन चॅलेंजअंतर्गत डिजिटल प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सेवा माझे योगदान कार्यक्रमात रक्तदान शिबिर, वृक्षारोपण अभियान, आरोग्य तपासणी, योग आणि ध्यान सत्र, स्वच्छता मोहीम राबविण्याचे नियोजन करावे.

विकसित भारत संकल्प यात्रा, सेवा ज्योत यात्रा, चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा, अंगणवाडी उत्सव, आशीवार्दाचा दिवा, बदलाची गोष्ट, आभार आणि संकल्पांची रांगोळी, नमो सेवागाथा, जल जन आणि सेवासंकल्प यात्रा, जनसेवक महाकुंभ इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करताना नागरिकांना सहभागी करून घ्यावे. संबंधित विभागांनी त्यांना सोपवलेल्या जबाबदाऱ्या पार पाडाव्यात, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या.

## जुन्या वाहनांच्या खरेदी-विक्रीसाठी वितरकांना मान्यता प्रमाणपत्र बंधनकारक

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांची खरेदी-विक्री किंवा देवाणघेवाण करणाऱ्या सर्व वाहन वितरकांना केंद्र सरकारच्या नियमांनुसार नमुना २९-बी अन्वये अधिकृतता प्रमाणपत्र घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. हे प्रमाणपत्र नसताना व्यवसाय सुरू ठेवल्यास संबंधितांवर मोटार वाहन कायदा व नियमांनुसार कारवाई करण्याचा इशारा नागपूर शहर प्रादेशिक परिवहन कार्यालयाने दिला आहे. केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार नोंदणीकृत वाहनांच्या खरेदी-विक्रीचा व्यवसाय करण्यासाठी संबंधित व्यक्ती अथवा आस्थापनेकडे नमुना २९-बी नुसार अधिकृत मान्यता असणे आवश्यक आहे. ही मान्यता नसलेल्या कोणत्याही व्यक्ती किंवा आस्थापनेला असा व्यवसाय करता येणार नाही.

नागपूर शहर प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व वाहन वितरकांनी नमुना २९-ए मध्ये मान्यतेसाठी तातडीने अर्ज सादर करावा. अजार्ची छाननी व तपासणी सूचीमधील बाबींची प्रत्यक्ष पडताळणी मोटार वाहन निरीक्षकांमार्फत केली जाईल. त्यानंतर पात्र आस्थापनांना नमुना २९-बी प्रमाणपत्र देण्यात येईल. सर्व वितरकांनी ही प्रक्रिया त्वरित पूर्ण करावी; अन्यथा विनाप्रमाणपत्र जुन्या वाहनांचे व्यवहार करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सुजित डोंगरजाळ यांनी कळवले आहे.

## पंचनाम्यांची भानगड बाजूला ठेवा, शेतकऱ्यांना सरसकट मदत द्या!

### सलील देशमुख यांची मागणी; कोरडा दुष्काळ जाहीर करून थेट खात्यात नुकसानभरपाई जमा करण्याचीं मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नागपूर जिल्ह्यात यंदा पावसाचा दीर्घ खंड पडल्याने खरीप पिकांना मोठा फटका बसला असून अनेक भागांत पिके करपून गेली आहेत. पावसाअभावी शेतकरी आर्थिक संकटात सापडला असताना प्रशासनाने पंचनाम्यांच्या किचकट आणि वेळखाऊ प्रक्रियेत अडकून न पडता परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन नागपूर जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा. तसेच शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत देऊन ती थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नागपूर जिल्हाध्यक्ष सलील देशमुख यांनी केली आहे.



नागपूर जिल्ह्यात खरीप हंगामाचे सरासरी पेरणी क्षेत्र सुमारे ४.५ ते ५ लाख हेक्टर आहे. यामध्ये सोयाबीन, कापूस, तूर आणि धान ही प्रमुख पिके घेतली जातात. यंदा ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये तब्बल तीन ते चार आठवड्यांचा पावसाचा खंड पडल्याने पिकांच्या वाढीवर गंभीर परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी सोयाबीनच्या शेंगा भरण्याच्या काळातच पाण्याचा ताण निर्माण झाल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. कापूस, तूर आणि इतर खरीप पिकांनाही याचा फटका बसला आहे.

पावसाअभावी केवळ खरीप हंगामच धोक्यात आलेला नाही, तर आगामी रब्बी हंगामाचीही चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. विहिरी, कूपनलिका आणि तलावांमधील जलसाठा घटल्याने रब्बीची पेरणी करायची कशी, असा प्रश्न निर्माण झाला आहे. हरभरा आणि गहू यासारख्या रब्बी पिकांसाठी पुरेसा ओलावा व पाणीसाठा उपलब्ध राहणार का, याबाबतही शेतकऱ्यांमध्ये चिंता आहे.

जिल्ह्यातील लघू, मध्यम व मोठ्या जलप्रकल्पांमध्येही अपेक्षित पाणीसाठा नसल्याचे देशमुख यांनी सांगितले. सिंचनाबरोबरच भविष्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने खरीप पिकांच्या नुकसानीकडे केवळ हंगामी नुकसान म्हणून न पाहता शेतकऱ्यांच्या संपूर्ण आर्थिक परिस्थितीचा विचार करावा, अशी मागणी त्यांनी केली.

**पंचनाम्यांच्या औपचारिकतेत वेळ घालवू नका**

जिल्ह्यात सरासरी किती पाऊस पडतो आणि यंदा प्रत्यक्षात किती पाऊस झाला, याची आकडेवारी प्रशासनाकडे उपलब्ध आहे. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतावर जाऊन पंचनामा करण्याच्या प्रक्रियेत वेळ घालविण्याऐवजी उपलब्ध हवामान व पीक नुकसानीच्या आकडेवारीच्या आधारे तातडीने निर्णय घ्यावा. आधीच आर्थिक संकटात असलेल्या शेतकऱ्यांना पंचनाम्यांच्या चक्रव्यूहात अडकवणे अन्यायकारक ठरेल, असे सलील देशमुख यांनी म्हटले आहे.

शासनाने नागपूर जिल्ह्यातील परिस्थितीची तातडीने पाहणी करून कोरडा दुष्काळ जाहीर करावा, शेतकऱ्यांसाठी विशेष आर्थिक पॅकेज मंजूर करावे, खरीप पिकांसाठी सरसकट नुकसानभरपाई द्यावी तसेच रब्बी हंगामासाठी बियाणे, सिंचन व इतर आवश्यक बाबींमध्ये मदत करावी. नुकसानभरपाईची रक्कम कोणत्याही विलंबाविना थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करावी, अशी मागणी देशमुख यांनी केली आहे.

## किट्समध्ये टेक्निकल मॉडेल प्रदर्शन आणि स्पर्धा संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

कविकुलगुरु इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स (किट्स), रामटेकच्या यांत्रिकी अभियांत्रिकी विभागातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग असोसिएशनतर्फे विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्याला व सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी टेक्निकल मॉडेल प्रदर्शन आणि स्पर्धाचे आयोजन १६ सप्टेंबर रोजी करण्यात आले. प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अविनाश श्रीखंडे यांच्या हस्ते झाले. प्रदर्शनात द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी तयार केलेली २० नाविन्यपूर्ण तांत्रिक मॉडेल्स सादर केली. या माध्यमातून विद्यार्थ्यांना तांत्रिक ज्ञान, कल्पकता, समस्या सोडविण्याची क्षमता तसेच व्यावहारिक कौशल्ये प्रदर्शित करण्याची संधी मिळाली असे प्रा. डॉ. पुंडलिक मेहर म्हणाले.

प्राचार्य डॉ. अविनाश श्रीखंडे म्हणाले की नावीन्य पूर्ण व्यावहारिक कौशल्ये प्रदर्शित केल्याने विद्यार्थ्यांना भारतात स्टार्टअप करिता प्रोत्साहन मिळेल. समारोप व बक्षीस वितरण केडीके अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूरचे प्रा. डॉ. पुंडलिक मेहर यांच्या हस्ते झाले. टेक्निकल मॉडेल प्रदर्शन करिता संस्था सचिव श्री व्हि. श्रीनिवास राव व कार्यकारी संचालक श्री व्हि. प्रणव यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी विभागप्रमुख डॉ. यशवंत जिभकाटे, विद्यार्थी डीन डॉ. पंकज आष्टणकर, समन्वयक प्रा. योगेश सुपले यांच्यासह प्रमोद पोकळे, डॉ. महेश मावले, डॉ. प्रशांत पराड, डॉ. श्रीकृष्ण चिंचोळकर, डॉ. धनंजय कटपातळ, डॉ. संजय बोरीकर, डॉ. सतीश भेले तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले कृषी अधिकारी, शास्त्रज्ञ!

### संत्रा, सीताफळ अन् सोयाबीन पिकांची क्षेत्रीय पाहणी, उत्पादनवाढीसाठी शास्त्रीय मार्गदर्शन

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष अडचणी जाणून घेत त्यावर तातडीने शास्त्रीय व तांत्रिक उपाययोजना सुचविण्याच्या उद्देशाने कृषी विभाग आणि डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वंडली येथील शास्त्रज्ञांनी नरखेड तालुक्यातील विविध गावांमध्ये शेतक ?यांच्या बांधावर जाऊन पिकांची क्षेत्रीय पाहणी केली. ब्राम्हणी येथील संत्रा, सावरगाव येथील सीताफळ आणि वाढोणा येथील सोयाबीन पिकांची पाहणी करून शेतकऱ्यांना उत्पादनवाढीसाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.



मौजा ब्राम्हणी येथे प्रवीण क्षीरसागर यांच्या संत्रा फळबागेला भेट देऊन झाडांची वाढ, फळधारणा, सिंचन व्यवस्था तसेच कीड व रोगांचा प्रादुर्भाव तपासण्यात आला. संत्रा बागेत संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन, सूक्ष्म अन्नद्रव्यांचा योग्य वापर, पाणी व्यवस्थापन, जैविक निविष्ठांचा वापर आणि कीड-रोग नियंत्रणाच्या उपाययोजनांबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

सावरगाव येथे रामभाऊ बेलखेडे यांच्या पाच वर्षे जुन्या सीताफळ बागेची पाहणी करण्यात आली. झाडांची वाढ व फळधारणेचा आढावा घेत योग्य छाटणी, झाडाचा आकार नियंत्रित ठेवणे, अन्नद्रव्य व पाणी व्यवस्थापन तसेच फुलोरा व फळधारणा वाढविण्याच्या उपाययोजनांची माहिती देण्यात आली. झाडाच्या वयानुसार बागेचे व्यवस्थापन केल्यास उत्पादनासोबतच फळांची गुणवत्ता सुधारण्यास मदत होईल, असे शास्त्रज्ञांनी सांगितले.

दरम्यान, वाढोणा येथे पुंडलिक चाफेकर यांच्या शेतातील सोयाबीन प्लॉटची पाहणी करण्यात आली. पिकाची सद्यस्थिती, वाढ, व्यवस्थापन आणि शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेण्यात आल्या. शास्त्रज्ञ प्रमोद पंचभाई यांनी सोयाबीन पिकातील विविध व्यवस्थापन बाबींवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रगतिशील शेतकरी मनोज बोडके, किशोर बोडके यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**बांधावरच समस्या, बांधावरच उपाय**

या क्षेत्रीय भेटीमुळे शेतकऱ्यांच्या समस्या प्रत्यक्ष शेतात जाऊन समजून घेणे शक्य झाले. पिकांचे नियमित निरीक्षण, माती व पिकाच्या गरजेनुसार अन्नद्रव्यांचा वापर, योग्य पाणी व्यवस्थापन तसेच कीड-रोगांचे वेळीच निदान करून नियंत्रण करण्याचे आवाहन करण्यात आले. बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर पिकांचे व्यवस्थापन करताना शास्त्रीय पद्धतींचा अवलंब करण्याचेही आवाहन कृषी अधिकाऱ्यांनी केले.

यावेळी प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वंडली येथील शास्त्रज्ञ प्रमोद पंचभाई, डॉ. योगेश धार्मिक, उद्यानविद्यावेत्ता, उपविभागीय कृषी अधिकारी काटोल बळीराम सातपुते, तालुका कृषी अधिकारी नरखेड के. डी. कोळी, मंडळ कृषी अधिकारी आर. चंडिमेश्राम, उपकृषी अधिकारी पी. आर. कोकाटे, सहाय्यक कृषी अधिकारी कुंदन जाधव, प्रशांत पैठणे, कृषी सेवक पी. एम. लांडे, अमित गिरडकर यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

थोडक्यात

## नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातर्फे 'आशीर्वाद का दिया' अभियान



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७६व्या वाढदिवसानिमित्त देशभरात 'आशीर्वाद का दिया' या अभियानाचे आयोजन करण्यात आले. तसेच त्यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या सेवेला अभिवादन करण्यासाठी दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातर्फे गुरुवार (दि. १७ सप्टेंबर) रोजी शहरातील सर्व १० झोनमधील ५१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, १०२ नागरी आरोग्य व आरोग्यवर्धिनी केंद्रे, आयसोलेशन रुग्णालय तसेच शासकीय रुग्णालयांमध्ये 'आशीर्वाद का दिया' अभियान उत्साहात, शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात आले. लकडगंज झोन अंतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, हिवरी नगर येथे मनपाच्या वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीच्या सभापती मनीषा अतकरे यांच्या उपस्थितीत दीप प्रज्वलित करून अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.

हे अभियान नागपूर महानगरपालिकेच्या महापौर निता ठाकरे यांच्या प्रोत्साहनात्मक पाठिंब्यामुळे यशस्वीपणे राबविण्यात आला. यावेळी वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष सभापती मनीषा अतकरे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार, झोनल वैद्यकीय अधिकारी डॉ. ख्वाजा मोईनुद्दीन, पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी डॉ. मयुरी घरत, एम.एस.यू.चे संवाद तज्ज्ञ श्री. स्नेहल करंजेकर तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## मनपाद्वारे प्रबोधनकार ठाकरे यांना अभिवादन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेतर्फे केशव सीताराम ठाकरे उपाख्य प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये महापौर निता ठाकरे यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी आयुक्त डॉ. विपीन, आरोग्य समितीच्या सभापती मनीषा अतकरे, शिक्षण समितीच्या सभापती संतोषदेवी लड्ढा, नगरसेवक शैलेश पांडे, नगरसेवक अभिजीत झा, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, उपायुक्त राजेश भगत, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी यांनीही पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.

उमरेड पोलिसांची मोठी कारवाईः

## दोन चोऱ्यांचा उलगडा करत दोन दुचाकी जप्त, एक अल्पवयीन बालक ताब्यात



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

उमरेड पोलीस स्टेशनच्या हद्दीतून चोरीला गेलेल्या दुचाकीचा तपास लावताना उमरेड पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. पोलिसांनी एका अल्पवहीन बालकाला ताब्यात घेतले असून त्याच्याकडून चोरीच्या दोन दुचाकी वाहनांसह सुमारे ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बु मधुबन कॉन्व्हेंट जवळील शेताजवळ उभी केलेली ज्युपिटर गाडी क्र. एम एच ४० डी के ३५१२ किंमत ४५,००० अज्ञात चोराने पळवून नेल्याची तक्रार गणेश रामकृष्ण वाघमारे यांनी उमरेड पोलीस ठाण्यात दिली होती. या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवून शोध सुरू केला होता. तपासादरम्यान, सदर चोरीची गाडी पाचगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत फिरवली जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून एका अल्पवयीन बालकाला ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या बालकाकडून तक्रारीतील ज्युपिटर गाडीव्यतिरिक्त किंमत ४५,००० आणखी एक स्प्लेंडर गाडी क्र. एम एच ३९ बी क्विव ९६२२ व किंमत ४०,००० हस्तगत करण्यात आली आहे.

पोलिसांनी एकूण ८५ हजार रुपये किमतीच्या दोन दुचाकी गाड्या जप्त केल्या आहेत. कायदा व नियमांनुसार सदर अल्पवहीन बालकाला नागपूर येथील निरीक्षण गृहात पाठवण्यात आले आहे. या प्रकरणात त्याच्यासोबत असलेल्या एका अनोळखी साथीदाराचा पोलीस शोध घेत असून, परिसरातील अन्य मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याच्या दृष्टीने पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के, उपविभागीय पोलीस अधिकारी मयांक माधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक धनाजी जळक, पो.उप.नि. संदीप सडमेक, पोलीस अंमलदार राधेश्याम कांबळे, पंकज बट्टे, चेतन माहुलकर, मंगेश निंबार्ते, रमेश टेकाम आणि आकाश गणवीर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# डिफेन्स न्यूक्लियर कॉरिडॉरच्या विरोधात भव्य मोर्चा

## जमिनी देण्यास शेतकऱ्यांचा तीव्र विरोध, सावनेर तहसील कार्यालयावर धडकला मोर्चा

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

सावनेर परिसरात प्रस्तावित डिफेन्स न्यूक्लियर कॉरिडॉरसाठी जमीन संपादनाच्या हालचालींना विरोध करत आज प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी सावनेर तहसील कार्यालयावर जोरदार मोर्चा काढत घेराव घातला. मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी वाचविण्याचा निर्धार व्यक्त करत प्रशासनाविरोधात घोषणाबाजी केली.

यावेळी शेतकऱ्यांनी व शिष्टमंडळाने उपविभागीय अधिकारी कल्याणकुमार डहाट यांना निवेदन देत, कोणत्याही परिस्थितीत आपली शेती





प्रकल्पासाठी देणार नसल्याची भूमिका स्पष्ट केली. आंदोलनादरम्यान "जमीन आमच्या हक्काची आहे, ती आम्ही कोणत्याही परिस्थितीत देणार नाही", "एक इंचही जमीन देणार नाही" अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, शेती हीच त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा एकमेव आधार असून, योग्य चर्चा, पारदर्शक प्रक्रिया आणि शेतकऱ्यांची संमती न घेता कोणताही निर्णय स्वीकारला जाणार नाही.

प्रशासनाने शेतकऱ्यांचे मागण्याचे निवेदन स्वीकारून त्यांच्या मागण्या शासनापर्यंत पोहोचविण्याचे आश्वासन दिले. या आंदोलनामुळे काही काळ तहसील कार्यालय परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पुढील निर्णय होईपर्यंत आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा शेतकरी व डिफेन्स न्युक्लीयर कॉरीडॉर विरोधी संघर्ष समितीने दिला आहे.

या भव्य आंदोलनाला रामटेक लोकसभा क्षेत्राचे खासदार श्यामकुमार बर्वे, माजी आमदार सुनील केदार, माजी जिल्हापरिषद उपाध्यक्ष नितीन राठी, माजी पंचायत समिती सभापती गोविंदा ठाकरे, उपसभापती राहुल तिवारी आदीने संबोधित केले तर या प्रसंगी माळेगावचे सरपंच धर्मेंद्रजी खोंडे, माजी सरपंच शंकररावजी मोवाडे, चंद्रकांत सोमकुवर, जोगा येथील सरपंच सन्माननीय शंकररावजी टोंगे वामनरावजी मोवाडे, माजी जिल्हा परिषद सदस्य दिलीपराव उईके ग्रामपंचायत जैतपूर छत्रापूर सरपंच अरविंद जी नाईक, मनोहर जी काकडे, सालई येथील श्रीकांत मोहतकर, भावेश वाखोरे, जटॉमखोरा येथील सरपंच कृष्णाजी पांडे, सावळी मोहातकर येथील हरीश मोहातकर, दिलीप मोहातकर, नानाजी माडेकर खुरसापार येथील भूषण कुबडे, मंगेश जोगी इत्यादी लोकांनी पुढाकार घेऊन निवेदन देण्यात आले आणि हजारोच्या संख्येमध्ये प्रत्येक गावातील ग्रामस्थ हे या निषेध कार्यक्रमाकरिता उपलब्ध होते.

नऊ गावातील आठ ग्रामपंचायत नुसार प्रत्येक पीडित शेतकऱ्यांच्या वतीने आपली निवेदन सादर केले आणि आपल्या न्यायाची भूमिका सरकारच्या समोर दाखल केली असुन सदर लढा पुढे ही सुरु ठेवण्यात येणार असल्याचे वृत्त आहे.

## कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनच्यावतीने विश्वकर्मा जयंती

### महाप्रसाद वितरणात शेकडोंचा सहभाग

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

दरवर्षी प्रमाणे कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन खापरखेडाच्या वतीने प्रकाश नगर वसाहतीतील राम मंदिरात विश्वकर्मा जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. हिंदू पौराणिक कथेनुसार भगवान विश्वकर्मा यांना वास्तुकलेचे शिल्पकार मानले जाते. प्रामुख्याने कारागीर, अभियंता, वास्तुविशारद, मेकॅनिक आणि कारखाना कामगारांसह विविध क्षेत्रात भगवान विश्वकर्मा जयंती साजरी केली जाते.

१७ सप्टेंबर गुरूवारला कॉन्टॅक्टर असोसिएशन खापरखेडाच्यावतीने राम मंदिर येथे भगवान विश्वकर्माच्या प्रतिमेची मंत्रोच्चारात महेश अढाऊ सप्तनीक यांच्या हस्ते पूजा अर्चना करण्यात आली. यानंतर महाप्रसाद वितरण करण्यात आले. यावेळी शेकडो, कंत्राटी कामगार, वीज केंद्र अधिकारी, कंत्राटदार व ग्रामस्थांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.



याप्रसंगी महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (संचलन) विलास मोटघरे, खापरखेडा वीज केंद्राचे मुख्य अभियंता डॉ. भूषण शिंदे, उपमुख्य अभियंता नितीन रोकडे, किशोर सूर्यवंशी, सचिन डेगवेकर, अधीक्षक अभियंता कमलेश मुनेश्वर, विलासकुमार उके, आनंद सातबद्रे, लेखा सहाय्यक महाव्यवस्थापक नंदकिशोर सातकर, वरिष्ठ सुरक्षा व्यवस्थापक नवीनकुमार सत्तीवाले, कल्याण अधिकारी आनंद वाघमारे, सरपंच मीनाक्षी तागडे, कॉन्टॅक्टर असोसिएशनचे अध्यक्ष दिलीप बनसोड, महासचिव दिवाकर घेर, मोहन जैन, शांताराम, गावंडे, शामराव सरोदे, पुरुषोत्तम चांदेकर, महेश अढाऊ, रमेश लोणारे, अनिल भोयर, कुणाल भोस्कर, विनोद बरडे, अहफाज अहमद, हेमराजसिह परिहार, मनीष धोटे, मनोज डेविड, रामचंद्र जोगे, राहुल गेडाम, यू.डी. गेडाम, अमर जैन, कबीर हुसेन, देवाजी कुबडे, बालू परिहार, अशोक वासनिक, राजेश गायकवाड, चंद्रशेखर पानतावणे, केशव पानतावणे, दिलीप ढगे, राजेश खंडारे, दिनेश लोडेकर, विनोद गोडबोले, अशोक शर्मा, राजू गभने, रवी सिंघम, राजेश खंडारे, संतोष पाटील, पप्पी वाडीभस्मे, नितीन मोहिते, आकाश परमार यांच्यासह कॉन्टॅक्टर असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संखेने उपस्थित होते.

## भं .टाकळी जवळ दोन दुचाकींची समोरासमोर धडक, दोघे गंभीर जखमी



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील भं.टाकळी परिसरात बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ४ वाजताच्या सुमारास दोन दुचाकींची आपसात धडक होऊन अपघात झाला. या अपघातात दोन जण गंभीर जखमी झाले. मिळालेल्या माहितीनुसार, MH 40 G 8399 क्रमांकाची दुचाकी नागपूरच्या दिशेने जात असताना रॉंग साईडने आल्याचे सांगण्यात येत आहे. त्याचवेळी MH 40 CJ 2001 क्रमांकाची दुचाकी नागपूरकडून सावनेरच्या दिशेने, कोळसा खाणीकडे जात असताना दोन्ही दुचाकींची धडक झाली.

## डोळ्यांवर पट्टी बांधून ४५ सेकंदांत ४० गणिते; अरहंत थुलचा विश्वविक्रम

### पाच वर्षीय बालप्रतिभेची मानसिक गणितात उल्लेखनीय कामगिरी; वेग, अचूकता आणि एकाग्रतेचे अनोखे प्रदर्शन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अवघ्या पाचव्या वर्षी नागपूरच्या अरहंत कोमल नितेश थुल याने मानसिक गणिताच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. अरहंतने डोळ्यांवर पट्टी बांधून ४० दोन- अंकी बेरीज व वजाबाकीची गणिते अवघ्या ४५ सेकंदांत अचूक सोडवून विश्वविक्रमाची नोंद केली आहे. या कामगिरीची वर्ल्ड रेकॉर्ड्स इंडिया येथे १८ ऑगस्ट २०२६ रोजी, नवीन विक्रम म्हणून नोंद करण्यात आली. विशेष म्हणजे, ही गणिते सोडवताना अरहंतने कॅल्क्युलेटर किंवा कोणत्याही इलेक्ट्रॉनिक साधनाचा वापर केला नाही. त्याने मानसिक गणना तंत्राच्या माध्यमातून सर्व उत्तरे अचूकपणे दिली.

या विक्रमामध्ये १० मानसिक गणितांचे संच असून, प्रत्येक संचात दोन-अंकी संख्यांच्या बेरीज व वजाबाकीच्या चार-चार क्रियांचा समावेश होता. एकूण ४० गणिते ४५ सेकंदांत सोडवताना अरहंतने विलक्षण वेग, अचूकता, स्मरणशक्ती आणि एकाग्रतेचे प्रदर्शन केले. लहान वयात मानसिक गणितावर मिळवलेले प्रभुत्व आणि डोळ्यांवर पट्टी बांधून आव्हानात्मक गणिते सोडवण्याच्या क्षमतेमुळे अरहंतने विशेष लक्ष वेधून



घेतले आहे. त्याच्या या यशाबद्दल कुटुंबीय, शिक्षक व हितचिंतकांकडून अभिनंदन होत असून, भविष्यातही तो विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## उमरेड बाजार पोस्ट ऑफिसच्या नूतनीकरणासाठी ४३ .७१ लाखांची मंजुरी

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

आमदार संजय मेश्राम यांच्या सातत्याने केलेल्या पाठपुरावा मुळे उमरेड शहरातील उमरेड बाजार उपडाकघराच्या नूतनीकरणासाठी ४३ लाख ७१ हजार २३३ रुपयांची प्रशासकीय मान्यता व खर्चास मंजुरी देण्यात आली आहे. पोस्टमास्टर जनरल, नागपूर विभागाच्या कार्यालयाने २२ जुलै २०२६ रोजी याबाबतचे मंजुरीपत्र जारी केले आहे. मंजूर रकमेतील ५ टक्के आकस्मिक खचार्चाही समावेश



करण्यात आला आहे. हे नूतनीकरण काम नागपूर एम एफ एल विभागांतर्गत करण्यात येणार असून, त्यासाठी विभागाने अंदाजपत्रक तयार केले आहे. संबंधित कामासाठी निविदा प्रक्रियाही जुलै-ऑगस्ट २०२६ मध्ये झाल्याची नोंद उपलब्ध आहे. उमरेड बाजार उपडाकघर हे नागपूर अंतर्गत येते आणि त्याचा पिनकोड ४४१२०३ आहे. या नूतनीकरणामुळे पोस्ट ऑफिसच्या इमारतीची दुरुस्ती व आवश्यक नागरी कामांना चालना मिळण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा मिळण्यास मदत होणार आहे. उमरेडच्या विकास कामांसाठी सातत्याने पाठपुरावा आणि विविध शासकीय विभागांच्या माध्यमातून विकासकामांना मंजुरी मिळवून देण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल असल्याचे स्थानिक पातळीवर सांगितले जात आहे.

## आंतरराज्यीय मोबाईल चोरट्यांच्या टोळीचा पर्दाफाश, ११ मोबाईलसह २.८९ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

गर्दीच्या ठिकाणी, आठवडी बाजारात आणि विविध कार्यक्रमांमध्ये नागरिकांचे मोबाईल लंपास करणाऱ्या एका मोठ्या आंतरराज्यीय टोळीचा उमरेड पोलिसांनी पदार्फाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी तीन अट्टल चोरट्यांना अटक केली असून, त्यांच्याकडून विविध कंपन्यांचे ११ महागडे मोबाईल असा एकूण २ लाख ८९ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

**वाठोडा (नागपूर) येथून आरोपींना ठोकल्या बेड्या**

दिनांक ११ सप्टेंबर २०२६ रोजी



उमरेड पोलिसांचे पथक तपासासाठी नागपूर येथे गेलेले असताना, आठवडी बाजारातून मोबाईल लंपास करणारे काही संशयित नागपुरातील वाठोडा परिसरात भाड्याने राहत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी तत्परतेने धाड टाकून तिघांना ताब्यात घेतले.

अटक करण्यात आलेले आरोपी शेख बाब्बर शेख अस्लम वय २६ वर्ष, रा. डाक बंगला, जि. साहेबगंज, झारखंड शेख ओजीत शेख आलम वय २४ वर्ष, रा. अझमपूर गोला, जि. कटिहार, बिहार अभिषेक संजय पोद्दार वय २८ वर्ष, रा. महाजन टोली, जि. साहेबगंज, झारखंड

**असा उघड झाला प्रकार**

आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या मोबाईलमध्ये सॅमसंग गॅलॅक्सी ए५५ ५जी फोनचा समावेश होता. या मोबाईल चोरीप्रकरणी उमरेड पोलीस ठाण्यात आधीच गुन्हा अप.क्र. ९०५/२०२६, कलम ३०३(२) भा.न्या.सं. दाखल असल्याने तिन्ही आरोपींना अधिकृत अटक करण्यात आली. चौकशीदरम्यान हे मोबाईल त्यांनी नागपूर शहर व लगतच्या परिसरातून चोरी केल्याची कबुली दिली आहे.

**दुसऱ्या राज्यात विक्री अन् बनावट सिमचा वापर**

पोलीस कस्टडी रिमांड पी सी आय दरम्यान आरोपींनी दिलेल्या माहितीनुसार, हे रॅकेट प्रामुख्याने आठवडी बाजार व गर्दीच्या ठिकाणी मोबाईल चोरी करायचे. त्यानंतर चोरीचे मोबाईल या टोळीच्या मुख्य सूत्रधाराच्या मदतीने झारखंड, बिहार आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये विकले जात असत.

या टोळीचा मुख्य सूत्रधार अत्यंत शातिर असून, तो आपली ओळख लपवण्यासाठी बनावट नाव सांगायचा आणि पोलिसांपासून वाचण्यासाठी बनावट सिम कार्डचा वापर करून इतर साथीदारांशी संपर्क साधायचा, ही बाब तपासात उघड झाली आहे. पोलीस सध्या या मुख्य सूत्रधाराचा शोध घेत आहेत.

ही धडक कारवाई नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. अनिल म्हस्के, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. मयांक माधव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

कारवाईत उमरेडचे पोलीस निरीक्षक धनाजी जळक, पो.उप.नि. संदिप सडमेक, पोलीस अंमलदार राधेश्याम कांबळे, पंकज बट्टे, चेतन माहुलकर, मंगेश निंबार्ते, रमेश टेकाम, आकाश गणवीर, महिला पोलीस अंमलदार स्विटी बांडेबुचे आणि सायबर शाखेचे सतीश राठोड यांनी मोलाची भूमिका बजावली सार्वजनिक ठिकाणी चोरी करणाऱ्या गुन्हेगारांवर उमरेड पोलिसांची ही कडक कारवाई आहे.

# बाप्पांच्या चरणी अवतरले 'श्री बद्रीनाथ धाम', संती गणेशोत्सव मंडळाचा अनोखा उपक्रम





दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : श्री संती गणेश उत्सव आणि सांस्कृतिक मंडळ हे नागपूर शहरातील अत्यंत मानाचे आणि प्रसिद्ध गणेशोत्सव मंडळांपैकी एक आहे. गणेशात्सवानिमित्त देखावा आणि गणपती दरवर्षी नागपूरच्या दारोडकर चौक, सेंट्रल एव्हेन्यू रोड जवळ आयोजित केला जातो. या मंडळाला एक मोठा ऐतिहासिक वारसा असून, हे नागपूरमधील प्रमुख जुन्या मंडळांपैकी एक आहे. यंदाही आकर्षक सजावटीसह 'श्री बद्रीनाथ धाम' साकारण्यात आले आहे. नयनरम्य या सजावटीची बाप्पांच्या भक्तांना भुरळ पडली असून मोठ्या प्रमाणात भक्तमंडळी गणपती बाप्पांच्या दर्शनाकरिता गर्दी करीत आहे. दैनिक सिंहवाणी वृत्ततर्फे प्रकाशित 'आरती संग्रह-२०२६'चा आरती संग्रह बाप्पांच्या चरणी अर्पण करण्यात आला. यावेळी संती गणेशोत्सव मंडळाचे संजय चिंचोळे यांच्यासह पदाधिकाऱ्यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. (छायाचित्र : दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर)


जनजागृत गणेश उत्सव मंडळ, आजनी


कल्पना शैलेश तांबट, जि.बुलढाणा


दामोधर कडू, डॉ. प्रशांत कडू, मोहित कडू, अड्याळवाले ले-आउट, उमरेड


भागवत परिवार, मंगळवारी पेठ, उमरेड

## बाप्पांच्या उत्सवाचा रंग, सिंहवाणी वृत्त संग...

दै. सिंहवाणी वृत्तच्या या उपक्रमाला वाचकांतर्फे उत्तम प्रतिसाद लाभत असून विदर्भातून घरगुती तसेच मंडळांच्या गणपती बाप्पांचे छायाचित्र प्राप्त होत आहे. आपणही या उपक्रमात सहभाग नोंदविण्यासाठी खालील क्रमांकावर छायाचित्र व्हॉट्सअप करा...
९६५७२३२०२६


इंद्रजीत डुंबरे परिवार, मंगळवारी पेठ उमरेड


जगदीश, संध्या, यशश्री, यशिका वैद्य परिवार बायपास चौक, उमरेड


गिरडकर परीवार, खाती कामट चौक, मंगळवारी पेठ, उमरेड


सौ. शालूताई, रविकुमार, स्वप्नील, कावळे परिवार मंगळवारी पेठ, उमरेड


सुनंदा, प्रीतम, सीमा, वीराज चिमुरकर परिवार, मंगळवारी पेठ, उमरेड


अनिल खानोरकर, इतवारी पेठ, उमरेड


विलास नागोराव कुर्वे, मंगळवारी पेठ, उमरेड

## नागपुरात जात वैधता प्रमाणपत्रासाठी त्रुटी पूर्तता शिबिर

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नागपूरमार्फत ह्यसेवा संकल्प अभियानह्न अंतर्गत १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्रांसंबंधात त्रुटी पूर्तता शिबिर आयोजित करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या घटनात्मक पदावरील कारकिदीर्ला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त तसेच त्यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यात हे अभियान राबवले जात आहे. या कालावधीत ज्या अर्जदारांना प्रकरणातील त्रुटींची पूर्तता करण्याबाबत नोंदणीकृत ई-मेल किंवा भ्रमणध्वनीवर कळवण्यात आले आहे, त्यांनी सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत समिती कार्यालयात उपस्थित राहून त्रुटींची पूर्तता करावी, असे आवाहन समितीचे उपायुक्त तथा सदस्य डॉ. मंगेश वानखडे यांनी केले आहे.


नवयुवक गणेशोत्सव मंडळ, न्यू ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर


रघुजीनगरचा राजा सांस्कृतिक गणेशोत्सव मंडळ, दक्षिण नागपूर


बाल गणेशोत्सव मंडळ, पेठपुरा, सावनेर


भंडारा शहरातील यादवराव पांडे महल येथील ऐतिहासिक गणपती (छायाचित्र - चंदू लिमजे)


सावन रमेश दुधेवार, गोकुल नगर, जुना कामठी रोड, कळमना, नागपूर

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
Epaper : epaper.sinhvani.com

# आई गौराई गणाची, आली माझ्या गं अंगणी...!




श्री ज्ञानेश्वर निघोट, रा. गोपाल नगर, नागपूर
यांचे कडील कास्तकार परिवारातील मागील ७ व्या पिढीचे
१९० वर्षांचे ''जेष्ठ गौरी/ महालक्ष्मी पुजन''



श्री दिपक लक्ष्मणराव मांडेकर,
एम.आय.जी. कॉलनी, त्रिमुर्ती नगर, नागपूर यांचे कडील
१०५ वर्षाचे असलेल्या जेष्ठ गौरी महालक्ष्मी



अनिलराव कान्हेरे, जुना सुभेदार ले-आऊट,
अयोध्या नगर, नागपूर



सुशील पांढरे, न्यू नरसाळा, नागपूर
यांच्या घरच्या महालक्ष्मी



प्रदीप काटेकर, दत्तात्रयनगर, नागपूर निवासी
यांचेकडील १५० वर्षे झालेल्या महालक्ष्मी



निंबाळकर परिवार, हनुमान नगर, नागपूर यांचेकडील
१२१ वर्षापासुनच्या महालक्ष्मी



किशोर सिंग, बैस प्रेम नगर, नागपूर



सुधीर चंपतराव बुटे, कोंढाळी यांचे
निवासस्थानी १०१ वर्षांच्या महालक्ष्मी

# मराठवाडा मुक्ती संग्राम : स्वातंत्र्य, लोकशक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेचा गौरवशाली अध्याय

प्रवीण टाके
उपसंचालक

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले; मात्र तत्कालीन हैदराबाद संस्थानातील जनतेला भारतीय संघात सहभागी होण्यासाठी आणखी तेरा महिने प्रतीक्षा करावी लागली. या संस्थानात आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा, तेलंगणाचा प्रदेश आणि कर्नाटकातील काही भागांचा समावेश होता. त्यामुळे १७ सप्टेंबर १९४८ हा दिवस केवळ एका प्रदेशाच्या मुक्तीचा दिवस नसून, भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणून स्मरणात राहिला आहे.

**स्वातंत्र्य मिळाले; पण हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले नव्हते**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिश सत्ता संपुष्टात आल्यानंतर संस्थानांच्या भारतात विलिनीकरणाचा प्रश्न निर्माण झाला. तत्कालीन हैदराबादचे निजाम मीर उस्मान अली खान यांनी हैदराबाद स्वतंत्र अस्तित्वात ठेवण्याची भूमिका घेतली. भारत सरकार आणि हैदराबाद संस्थान यांच्यात वाटाघाटी सुरू राहिल्या. काही काळासाठी स्थिती कायम ठेवण्याचा करार अर्थात 'जैसे थे' करार करण्यात आला. मात्र संस्थानातील राजकीय परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होत गेली. गावागावांत रजाकारांविरुद्ध संघर्ष वाढत गेला. हैदराबाद संस्थानातील जनतेमध्ये नागरी हक्क, जबाबदार शासन आणि भारतीय संघात सहभागी होण्याची मागणी अधिक तीव्र होत होती. या लोकचळवळीला हैदराबाद स्टेट काँग्रेस, महाराष्ट्र परिषद तसेच विविध सामाजिक व राष्ट्रीय विचारांच्या संघटनांनी दिशा दिली.

**मराठवाड्यात जागृतीची बीजे**

मराठवाड्यातील मुक्ती संग्राम अचानक सुरू झालेला नव्हता. त्यामागे अनेक वर्षांची सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय जागृती होती. राष्ट्रीय विचारांचा प्रसार करण्यासाठी विविध ठिकाणी शाळा, वाचनालये आणि सामाजिक संस्था कार्यरत होत्या. परभणीचे नूतन विद्यालय, औरंगाबादचे सरस्वती भुवन विद्यालय, हिप्परगा येथील शारदा मंदिर, अंबाजोगाईचे योगेश्वरी विद्यालय, उदगीरचे श्यामलाल विद्यालय, लातूरमधील ज्युबिली विद्यालय, बीडचे चंपावती विद्यालय, नांदेडचे प्रतिभा निकेतन आदी संस्थांनी राष्ट्रीय जागृतीच्या कार्याला हातभार लावला. या कायार्ला स्वामी रामानंद तीर्थ आणि बाबासाहेब परांजपे यांची प्रेरणा लाभली.

१९३८ मध्ये हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या स्थापनेने या चळवळीला संघटित राजकीय स्वरूप मिळाले. निजाम सरकारने या संघटनेवर बंदी घातल्यानंतर सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारण्यात आला. मुक्तिसंग्रामासाठी स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू, रवी नारायण रेड्डी, देवीसिंह चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, शंकरसिंह नाईक, विजयेंद्र काबरा, बाळासाहेब परांजपे यांनी लढ्याचे नेतृत्व केले. काशिनाथ कुलकर्णी, दगडाबाई शेळके, विठ्ठलराव काटकर, हरिश्चंद्र जाधव, जनार्दन होर्टीकर गुरुजी, सूर्यभान पवार, आ. कृ. वाघमारे, विनायकराव चारठाणकर, विश्वनाथराव कातमेश्वरकर अशा अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास अजरामर केला आहे. गावागावातील संघर्षांमध्ये अनेक अनामिक वीरांनी आपले बलिदान दिले आहे. १९३८ च्या सत्याग्रहातील नांदेडच्या कार्यकर्त्यांचा सहभाग या लढ्यात विशेषत्वाने नोंदविला गेला आहे.

**आठ जिल्ह्यांची व्यापक लोकचळवळ**

आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली हे आठ जिल्हे आहेत. तत्कालीन काळातील प्रशासकीय सीमांमध्ये काही बदल झाले असले तरी या संपूर्ण मराठी भाषिक प्रदेशाने हैदराबाद मुक्तीच्या लढ्यात महत्त्वपूर्ण सहभाग नोंदविला. मराठवाड्याचा संपूर्ण मराठी भाषिक प्रदेश भारतीय संघात विलीन होण्यासाठी आतुर होता. बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई हे स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कायार्चे प्रमुख केंद्र होते. हैदराबाद मुक्ती संग्रामात बीड जिल्ह्यातील अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी योगदान दिले आणि अनेक स्वातंत्र्यसैनिक हुतात्मा झाले. या व्यापक लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, विजयेंद्र काबरा आणि पी. एच. पटवर्धन यांसारख्या नेत्यांची भूमिका महत्त्वाची ठरली. लढ्याचे स्वरूप केवळ एका शहरापुरते मर्यादित नव्हते. नांदेड, परभणी, सेलू, जालना, अंबड, बीड, उस्मानाबाद, लातूर, अंबाजोगाई, उदगीर, उमरी, धमार्बाद, कंधार, देगलूर आदी भागांत विविध स्वरूपाचे सत्याग्रह, जनजागृती आणि प्रतिकाराच्या चळवळी झाल्या.

**दडपशाहीला लोकशक्तीचा प्रतिकार**

स्वातंत्र्याच्या मागणीला तत्कालीन सत्तेकडून विरोध झाला. आंदोलनकर्त्यांना अटक, कारावास आणि विविध प्रकारच्या दडपशाहीला सामोरे जावे लागले. परिस्थिती अधिक गंभीर झाल्यानंतर रजाकारांच्या हिंसक कारवायांमुळे सामान्य नागरिकांच्या अडचणी वाढल्या. लोकशाही, नागरी हक्क आणि जबाबदार शासनासाठी जनतेने निकराचा संघर्ष केला. प्रशासनाच्या नोंदीनुसार, १९४२ च्या 'भारत छोडो' चळवळीत नांदेड, वैजापूर, गंगापूर, परभणी, सेलू, उस्मानाबाद, बीड, अहमदपूर, जालना आणि अंबड यांसारख्या ठिकाणी सत्याग्रहींना कारावास भोगावा लागला. या आंदोलनामुळे हैदराबाद संस्थानातील स्वातंत्र्यवादी शक्ती अधिक संघटित झाल्या. स्वातंत्र्याच्या लढ्यातील या सहभागाने मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या लढ्याला आणखी गती मिळाली.

**निजामाची आणि भारताची भूमिका**

भारत सरकारने हैदराबाद प्रश्न सोडविण्यासाठी सुरुवातीला संवाद आणि वाटाघाटींचा मार्ग स्वीकारला. मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याने भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी निर्णायक भूमिका घेतली. १३ सप्टेंबर १९४८ रोजी 'ऑपरेशन पोलो' सुरू झाले. भारतीय सैन्याच्या कारवाईसमोर हैदराबाद संस्थानाच्या सैन्याचा प्रतिकार फार काळ टिकला नाही. १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाने शरणागती स्वीकारली आणि हैदराबाद राज्य भारतीय संघात सहभागी झाले. केंद्र सरकारच्या अधिकृत नोंदीत या प्रक्रियेला भारताच्या राजकीय एकात्मतेतील महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून अधोरेखित केले आहे.

स्वातंत्र्योत्तर भारताने संस्थानांचे एकत्रीकरण करताना संवाद, राजनैतिक प्रयत्न आणि आवश्यक त्या वेळी निर्णायक कारवाई यांचा समन्वय साधला. हैदराबादच्या प्रश्नावर भारत सरकारने सुरुवातीला संवाद व राजनैतिक प्रयत्नांचा मार्ग स्वीकारला; मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्यानंतर निर्णायक लष्करी कारवाई करण्यात आली. हैदराबादचा संघर्ष आणि विलीनीकरण हा एकसंघ भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय ठरला.

भारताच्या मध्यभागी स्वतंत्र राज्याचे अस्तित्व कायम राहिल्यास निर्माण होणारी राजकीय व प्रशासकीय गुंतागुंत किती गंभीर ठरली असती, याची कल्पना आजही करता येते. भारताच्या राजकीय एकात्मतेच्या दृष्टीने ही कारवाई किती महत्त्वाची होती, हे त्यानंतरच्या घडामोडींवरून स्पष्ट होते. त्यामुळे संस्थानांच्या विलीनीकरणासाठी झालेला हा संघर्ष भारताच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटनाक्रम ठरला आहे.

**भाषिक वेगळेपणही लक्षणीय ठरले**

१९४८ मध्ये भारतीय संघात समाविष्ट झालेले हैदराबाद संस्थान आज एकाच राज्याचा भाग नाही. त्यातील मराठवाडा महाराष्ट्रात, तेलुगू भाषिक प्रदेश तेलंगणात आणि कन्नड भाषिक प्रदेश कर्नाटकात समाविष्ट झाला. तत्कालीन हैदराबाद राज्यात आजच्या तेलंगणासह मराठवाडा आणि कर्नाटकातील काही जिल्ह्यांचा समावेश होता.

भाषावार प्रांतरचनेनंतर मराठवाडा १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याचा भाग झाला. अशा प्रकारे १९४८ मध्ये भारतीय संघाशी जोडलेला हा प्रदेश पुढे आधुनिक महाराष्ट्राच्या प्रशासकीय आणि सामाजिक विकासाचा अविभाज्य घटक बनला.

**१७ सप्टेंबर : मुक्ती संग्राम दिन**

महाराष्ट्र शासनाने ४ मे २००१ रोजी शासन निर्णयाद्वारे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा विभागात 'मुक्ती संग्राम दिवस' म्हणून कायमस्वरूपी साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर १७ सप्टेंबर रोजी मराठवाड्यात शासकीय पातळीवर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांत हा दिवस साजरा केला जातो. विभागीय मुख्यालय असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्याची परंपरा आहे. इतर जिल्ह्यांतही पालकमंत्री किंवा नियुक्त मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण केले जाते.

छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्री ध्वजारोहण करतात, कारण हे शहर मराठवाड्याचे विभागीय मुख्यालय असून मुक्ती संग्रामाच्या स्मृतींशी जोडलेले प्रमुख केंद्र आहे. स्मृतिस्तंभाला अभिवादन, हुतात्म्यांना श्रद्धांजली, ध्वजारोहण, मानवंदना आणि विविध शासकीय कार्यक्रमांद्वारे या इतिहासाचे स्मरण केले जाते. महाराष्ट्र शासन मुक्ती संग्रामाचा इतिहास पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी १०० कोटी रुपये खर्चून छत्रपती संभाजीनगर येथे स्मारक उभारत आहे.

**इतिहासाचा सन्मान, भविष्याची प्रेरणा**

मराठवाडा मुक्ती संग्राम हा केवळ भूतकाळातील संघर्ष नाही. तो लोकशाही, स्वातंत्र्य, नागरी हक्क, राष्ट्रीय एकात्मता आणि लोकसहभागाच्या मूल्यांची जाणीव करून देणारा इतिहास आहे. या लढ्यात ज्ञात-अज्ञात असंख्य स्वातंत्र्यसैनिक, कार्यकर्ते, महिला, युवक आणि सामान्य नागरिकांनी योगदान दिले. त्यांच्या त्यागामुळे १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाड्याच्या भारतीय संघात विलिनीकरणाचा मार्ग मोकळा झाला.

**- विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**